। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक २६ वा । रविवार दिनांक २९ मार्च, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार सन्मानित

## ई-गव्हर्नन्समध्ये धाराशिव राज्यात तिसरा - जिल्हाधिकारी पुजार यांच्या नेतृत्वाला दाद



धाराशिव (जिमाका )- राज्य शासनाच्या कार्यालयीन मूल्यमापनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स विशेष कृती कार्यक्रमांतर्गत आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत धाराशिव जिल्ह्याने राज्यात तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.आज मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात आयोजित गौरव समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विभागांचा देखील सन्मान करण्यात आला.या वेळी माहिती तंत्रज्ञान तथा सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार,मुख्य सचिव राजेश अग्रवाल,पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या कुशल नेतृत्व,दूरदृष्टी आणि परिणामकारक नियोजनामुळे धाराशिव जिल्ह्याने ई-गव्हर्नन्स क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली आहे.जिल्हा प्रशासनाने तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून कामकाज अधिक गतिमान,पारदर्शक आणि नागरिकाभिमुख केले असून याची दखल राज्यस्तरावर घेण्यात आली आहे.

१५० दिवसांच्या कृती आराखड्यानुसार जिल्ह्यात विविध नाविन्यपूर्ण डिजिटल प्रणाली विकसित करण्यात आल्या.यामध्ये डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड,तुळजाई चॅटबॉट, 'कल्पवृक्ष - स्मार्ट जीआर' प्रणाली तसेच 'जीवनरेखा' प्रणाली या महत्त्वाच्या उपक्रमांचा समावेश आहे.डिस्ट्रिक्ट डॅशबोर्डमुळे विविध शासकीय योजनांचा एकत्रित आढावा घेणे सुलभ झाले असून निर्णय प्रक्रियेला वेग आला आहे. 'कल्पवृक्ष - स्मार्ट जीआर' प्रणालीमुळे शासन निर्णय व परिपत्रकांची अद्ययावत माहिती सहज उपलब्ध होत असल्याने प्रशासकीय कामकाज अधिक अचूक आणि जलद झाले आहे.

'जीवनरेखा' प्रणालीद्वारे शेत रस्त्यांची नोंद व व्यवस्थापन सुलभ झाले असून ग्रामीण भागातील तक्रारींचे प्रभावी निराकरण होत आहे.तसेच तुळजाई चॅटबॉटच्या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय सेवांची माहिती घरबसल्या उपलब्ध होत असून सेवा वितरण अधिक सुलभ,जलद आणि विश्वासार्ह झाले आहे.ई-ऑफिस प्रणालीच्या व्यापक वापरामुळे 'पेपरलेस कार्यालय' संकल्पना प्रत्यक्षात येत असून प्रशासनाची कार्यक्षमता वाढली आहे.

या यशामागे जिल्ह्यातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सांघिक प्रयत्न असल्याचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी नमूद केले. अत्याधुनिक तंत्रज्ञान,विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) याचा वापर प्रशासनात वाढवून कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांनी उपलब्ध डिजिटल सुविधांचा अधिकाधिक लाभ घ्यावा,असे आवाहनही जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

## क्राईम न्यूज

### सोन्याचे दागिणे व रोख रकमेची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी निळकंठ तानाजी फत्तेपुरे, वय ३६ वर्षे, रा. बोरी ता.उमरगा जि. धाराशिव यांचे राहते घराचा कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.२६.०३.२०२६ रोजी तोडून आत प्रवेश करुन १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व आत्माराम दशरथ होळकर यांचे घराचे कडी कोंडा तोडून रोख रक्कम ५०,००० असा एकुण १,३०,२५० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- निळकंठ फत्तेपुरे यांनी दि.२७.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१(४), ३०५ (अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ढोकी येथून मोटारसायकची चोरी

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी प्रमोद मारुती इंगळे, वय ३५ वर्षे, रा. ढोकी ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ४०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि.१८.०३.२०२६ रोजी .ढोकी येथील इस्लामी खानावळ समोर मोकळ्या जागेतुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- प्रमोद इंगळे यांनी दि.२७.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### चार महिलांनी केली ८० हजाराच्या सोन्याची चोरी

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी हिरालाल जनार्धन पेडगावकर, वय ६६ वर्षे, रा. स्वाती समर्थ नगर बार्शी रोड परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांचे समर्थ ज्वेलर्स खर्डेकर गोल्ड या दुकानामध्ये परंडा येथे अनोळखी चार महिलांनी दि. २६.०३.२०२६ रोजी दुकानातील ६०० ग्रॅम वजनाचे ७ पायातील चांदीचे पेंजणाचे जोड एकुण ८०,००० किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- हिरालाल पेडगावकर यांनी दि.२७.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अणदूर येथून मोटारसायकल चोरली

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी मल्लिनाथ मारुती लांडगे, वय ५९ वर्षे, रा. अणदुर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची अंदाजे ४०,००० किंमतीची हिरो कंपनीची मोटरसायकल क्र एमएच २५ ए.एन. ८१२१ ही दि.२५.०३.२०२६ रोजी १०.३० वा. जवाहर विद्यालय अणदुर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- मल्लिनाथ लांडगे यांनी दि.२६.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## ग्रामीण जनतेसाठी सुलभ सेवा : ई-गव्हर्नन्समुळे धाराशिव प्रशासन अधिक गतिमान



धाराशिव (जिमाका)-राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स विशेष कृती कार्यक्रमांतर्गत धाराशिव जिल्ह्याने राज्यात तृतीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.हे यश केवळ एक क्रमांक नसून,जिल्ह्यातील प्रशासनात विशेषतः महसूल विभागात झालेल्या डिजिटल परिवर्तनाचे द्योतक आहे.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमांनी ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे.महसूल विभाग हा थेट ग्रामीण नागरिकांशी निगडित असलेला अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे.जमीन नोंदी,शेत रस्ते,विविध प्रमाणपत्रे,तक्रारींचे निराकरण अशा अनेक बाबींमध्ये नागरिकांना या विभागाशी सतत संपर्क साधावा लागतो. अशा वेळी ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून सेवा सुलभ,जलद आणि पारदर्शक झाल्याने नागरिकांचा वेळ,श्रम आणि खर्च मोठ्या प्रमाणात वाचत आहे.

धाराशिव जिल्ह्यात विकसित करण्यात आलेल्या 'डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड' प्रणालीमुळे विविध शासकीय योजनांचा एकत्रित आढावा घेणे सुलभ झाले आहे.यामुळे महसूल प्रशासनाला योजनांची अंमलबजावणी,प्रगती आणि पाठपुरावा अधिक प्रभावीपणे करता येत आहे.निर्णय प्रक्रियेला वेग मिळाल्याने नागरिकांच्या समस्यांवर त्वरित उपाययोजना शक्य होत आहेत.

'कल्पवृक्ष - स्मार्ट जीआर' प्रणाली ही महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरली आहे.शासन निर्णय, परिपत्रके आणि कायदे यांची अद्ययावत माहिती एका क्लिकवर उपलब्ध होत असल्याने कामकाज अधिक अचूक आणि सुसंगत झाले आहे.यामुळे निर्णय घेताना होणाऱ्या त्रुटी कमी होऊन प्रशासनातील पारदर्शकता वाढली आहे.

ग्रामीण भागाशी थेट संबंध असलेली 'जीवनरेखा' प्रणाली ही या डिजिटल परिवर्तनाची एक महत्त्वाची कडी ठरली आहे.शेत रस्त्यांची गट नंबर व सर्वे नंबरनिहाय नोंद केल्यामुळे शेतकऱ्यांच्या तक्रारींचे जलद निराकरण शक्य झाले आहे.यामुळे शेती उत्पादन,वाहतूक आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे.महसूल विभागाच्या कामकाजात यामुळे अधिक सुसूत्रता आणि जबाबदारीची भावना निर्माण झाली आहे.

तसेच 'तुळजाई चॅटबॉट' या उपक्रमामुळे ग्रामीण नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती घरबसल्या मिळू लागली आहे.संजय गांधी योजना,पुरवठा विभाग, नैसर्गिक आपत्ती यांसारख्या सेवांची माहिती काही क्षणांत मिळत असल्याने नागरिकांचा प्रशासनावर विश्वास अधिक दृढ होत आहे.

ई-ऑफिस प्रणालीमुळे 'पेपरलेस कार्यालय' संकल्पना प्रत्यक्षात येत असून फाइलांची हालचाल वेगवान झाली आहे. महसूल विभागातील कामकाज अधिक पारदर्शक,उत्तरदायी आणि वेळेत पूर्ण होऊ लागले आहे.यामुळे नागरिकांच्या कामांना विलंब न होता सेवा वितरण अधिक विश्वासार्ह बनले आहे.

या सर्व उपक्रमांच्या यशामागे जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सांघिक प्रयत्न महत्त्वाचे ठरले आहेत. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनीही अत्याधुनिक तंत्रज्ञान,विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) चा वापर वाढवून प्रशासन अधिक सक्षम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. नागरिकांनी या डिजिटल सुविधांचा अधिकाधिक लाभ घ्यावा,असे आवाहन त्यांनी केले आहे.

एकूणच, ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमामुळे धाराशिव जिल्ह्यातील महसूल प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख बनले आहे.ग्रामीण भागातील नागरिकांना सुलभ सेवा देण्याच्या दिशेने हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे असून,भविष्यातील सुशासनाचा मजबूत पाया म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.

## धाराशिव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी प्रियंवदा महाडदळकर यांची नियुक्ती



धाराशिव (जिमाका)- प्रियंवदा महाडदळकर यांची धाराशिव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.सामान्य प्रशासन विभागाचे सहसचिव यांच्या स्वाक्षरीने २७ मार्च रोजी त्यांच्या नियुक्तीचे आदेश निघाले.भारतीय प्रशासकीय सेवेत २०२२ मध्ये देशात १३ वा आणि महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या श्रीमती.महाडदळकर यांनी मुंबई येथील व्हीजेटीआय अभियांत्रिकी महाविद्यालयातून इलेक्ट्रॉनिक्स विषयात पदवीचे शिक्षण पूर्ण केले असून, त्यानंतर बेंगळुरू येथील आयआयएममधून फायनान्स विषयात एमबीए पदवी संपादन केली आहे. शैक्षणिकदृष्ट्या भक्कम पायाभूत तयारीनंतर त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवत प्रशासकीय सेवेत प्रवेश केला.

प्रशासकीय कारकिर्दीच्या सुरुवातीच्या टप्प्यात त्यांनी जून २०२३ ते मे २०२४ या कालावधीत धाराशिव जिल्ह्यातच त्यांनी परिविक्षाधीन काळात सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून काम करताना स्थानिक प्रशासन,ग्रामीण विकास व विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. त्यानंतर त्यांनी दिल्ली येथे अर्थ मंत्रालयात सहाय्यक सचिव म्हणून काम पाहिले.

यानंतर अमरावती जिल्ह्यातील धारणी येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या प्रकल्प अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी (एसडीओ) म्हणून त्यांनी कार्य करत आदिवासी व दुर्गम भागातील विकासकामांना गती दिली. स्थानिक समस्यांचे निराकरण, शासकीय योजनांचा प्रभावी लाभ आणि प्रशासनातील पारदर्शकता यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

आता धाराशिव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी श्रीमती. महाडदळकर यांची नियुक्ती झाल्याने जिल्ह्यातील ग्रामीण विकास,पायाभूत सुविधा,शिक्षण,आरोग्य आणि सामाजिक कल्याण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीला गती मिळेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## परंडा शहर राममय! भगवा ध्वज शोभायात्रा उत्साहात: लाल मारुती मंदिरात महाआरतीने समारोप

परंडा (प्रतिनिधी)- शहरात गुरुवारी श्रीराम जन्मोत्सवानिमित्त भाजपच्या वतीने आयोजित केलेल्या भव्य भगवा ध्वज शोभायात्रेने संपूर्ण शहर राममय केले. माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, युवा नेते मल्हार राणाजगजितसिंह पाटील, जिल्हा परिषद सदस्य धनंजय सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत निघालेल्या या यात्रेने शहरभर भक्ती आणि उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

शोभायात्रेचा शानदार शुभारंभ महाराणा प्रतापसिंह चौक येथून झाला. युवा नेते मल्हार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते प्रभू श्रीराम यांच्या मूर्तीचे पूजन करून भगवा ध्वज फडकवण्यात आला. यावेळी उपस्थित रामभक्तांचा उत्साह ओसंडून वाहत होता. संपूर्ण मार्गावर जय श्रीरामच्या जयघोषाने वातावरण भक्तिमय झाले होते. यात्रेचे मुख्य आकर्षण होते प्रभू श्रीराम, लक्ष्मण, सीता आणि हनुमान यांची वेशभूषा केलेले लहान मुले. शेकडो रामभक्तांनी हातात भगवे ध्वज घेऊन सहभाग नोंदवला. महिलांची मोठी उपस्थिती आणि मार्गावर होणारी पुष्पवृष्टी यामुळे शोभायात्रेची भव्यता अधिक खुलून दिसत होती.

शोभायात्रा श्रीराम मंदिर परिसरातून पुढे जाऊन ऐतिहासिक श्री लाल मारुती मंदिर येथे पोहोचली. येथे माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, युवा नेते मल्हार पाटील, जिल्हा परिषदेचे सदस्य धनंजय सावंत, तसेच शैला ठाकूर, ज्योती सावंत यांच्या हस्ते भक्तिभावाने महाआरती करण्यात आली. यावेळी तालुकाध्यक्ष अरविंद रगडे, ड. संतोष सूर्यवंशी, उपनगराध्यक्ष समरजितसिंह ठाकूर, गौतम लटके, जयदेव गोफणे, विकास कुलकर्णी, तुषार नेटके, उमाकांत गोरे, शहराध्यक्ष ज्योती भातलवंडे, गायत्री तिवारी आणि इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परंडा शहर जणू रामाच्या रंगात न्हाल्याचे भास होत होते, तर उत्साही रामभक्तांनी यात्रेला जोरदार प्रतिसाद दिला.

## आदर्श प्राथमिक विद्यामंदिरात पालक मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- आदर्श प्राथमिक विद्यामंदिर, धाराशिव येथे दि.२८ मार्च २०२६ रोजी इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यास पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापकांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी मेळाव्याचे उद्दिष्ट स्पष्ट करत शाळा व पालक यांच्यातील संवादाचे महत्त्व अधोरेखित केले.

वर्गशिक्षक वैभव चव्हाण यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यास, शिस्त व वर्तनाविषयी पालकांशी संवाद साधत आवश्यक सूचना दिल्या. यावेळी पालकांनीही आपले अभिप्राय व सूचना मांडल्या.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक के.बी. घोडके, उपमुख्याध्यापक बी.के. कुंभार यांनी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा व पालक यांचा समन्वय अत्यावश्यक असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव धनंजय आप्पा पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पालक व शिक्षकांनी एकत्रित प्रयत्न करून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी कार्य करावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने करण्यात आला.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

## लातूर समाचार

### भोंदुगिरीस खतपाणी घालणे पडते महागात

भोंदुगिरीस कोण जबाबदार असा प्रश्न सतत पडतो. मात्र प्रामाणिक मत समोर येते ते म्हणजे याला जबाबदार जनता आहे, त्यांनीच कोणताही विचार न करता, विज्ञानाची साथ न घेता अविचाराने भोंदुगिरीस प्रोहत्सान दिले जाते हे सर्वात वाईट बाब आहे. भोंदु हा आकाशातून पडलेला प्राणी नाही तर जनतेतून तयार झालेला व्यक्ती आहे. यदाकदाचित तो विज्ञानाची साथ ही घेता असेल. खरातने जो नकली साप तयार केला तो ड्रोनच्या मदतीने नाचवित होता. रिमोट कंट्रोल हाती ठेवून तो सापाला नाचवित होता असे समजते त्यामुळे त्याने विज्ञानाची साथ घेतली, मात्र जनतेनी नाही. जनता विचारी नाही. जगात विज्ञानाशिवाय पर्याय नाही. भारताचा प्राचीन इतिहास अभ्यासला तर भारतीय किती विज्ञानात पुढे होते. आयुर्वेदात पुढे होते. त्याकाळी सर्जरी केली जात. जखमांना टाके मारून शिवले जात होते. हवेतून समोरचे शस्त्र हवेत नष्ट करणारे विज्ञान भारतीयांकडे होते.रामायण किंवा महाभारतात याचे दाखले सापडतात. प्राचीन वैदिक ग्रंथाचा अभ्यास केला पाहिजे. काही प्राचीन वैदिक ग्रंथात काही स्वार्थीनी भेसळ केले आहे. मुळ ग्रंथाचा अभ्यास केला पाहिजे. भारतीय प्राचीन ग्रंथ संपदा अनमोल ठेवा आहे. रात्रीच्यावेळी सैन्यावर तुटून पडणे, रस्त्याचा शोध घेणे आवघड असताना ते अचुक मारा व रस्ते शोधले जात होते. अशी कोणती शक्ती भारतीय राजा व भारतीय सैन्याकडे होती, केवळ विज्ञानाच्या जोरावर विजय हस्तगत करीत होते. विज्ञानाशिवाय अशक्य बाबी असताना भोंदुबाबाकडे कशाला जातात हेच कळून येत नाही. त्याला जर वाईट कामाची शिक्षा होणार, जेलमध्ये जावे लागणार हे कसे काय खरात याला कळाले नसेल. तो तर जाणता होता ना? त्याला अगोदर भविष्य कळाले पाहिजे होते. शेवटी वाईट कर्माचे फळ ईश्वर देतच असतो. ईश्वरीय अशी ताकद आहे ती सर्वश्रेष्ठ आहे. ईश्वरीय ताकदीसमोर सर्व फेल आहेत. मुळात मातृशक्तीची विटंबना करता. लाज वाटायाला पाहिजे. ज्यांनी जन्म दिला तीच्याशी गद्दारी मात्र ही अल्पकाळ चालली आहे. त्यामुळे वाईट काम करणाऱ्यानी सतत विचार केला पाहिजे. भोंदु या शब्दाचा अर्थात बरेच सामावले आहे. त्यामुळे अविचाराने व फसवणुक झाल्याने भोंदुगिरीस बळी पडतात. यात अशिक्षित मंडळी बळी जावू शकते, मात्र शिकलेली मंडळीसुद्धा आडकली, अत्याचारास बळी गेली आहे. लेकरे होणे किंवा न होणे या बाबत डॉक्टर तज्ज्ञमंडळीच कारण सांगू शकतो. भोंदुकाय सांगणार! पुर्वी पेक्षा आलिकडे मुल न होण्याचे प्रकार का वाढले आहेत याचा विचार नागरिकांनी केला पाहिजे. मुळात अविचाराने भोंदुस बळी पडतात. खरात म्हणतो मी बळजबरी केली नाही. ते ही वास्तवात खरे असेल मात्र त्यांचे कृत्य हे घृणास्पद आहे हे मान्यच कोणीही करणार नाही. काहींनी या बाबत जे भोंदुबाबाला साथ देणारे आहेत, त्याचा शोध घेतला पाहिजे. त्याला शिक्षा झाली पाहिजे. खरात तर दोषी ठरेल किंवा नाहीहि? आज सांगता येत नाही मात्र त्याने जे कृत्य केले ते काळीमा फासणारे आहे. अफाट संपत्ती जमावली आहे. अफाट नामावंताशी संबंध जुळविले आहेत. आपल्याकडे काय परिस्थिती सांगते? प्रुफ हवे. मोगम सांगणे याला महत्त्व नाही. सर्वात मोठा पुरावा आवश्यक असतो. कोणी कायद्याच्या कचाट्यात सापडतो तर कायद्याच्या कचाट्यातून सुटतो सुद्धा? त्यामुळे जनतेनी सावध वागले पाहिजे. जनतेनी विचारपुर्वक विज्ञानीची साथ घेवून चालले पाहिजे. ज्ञान व विज्ञानाला सोबत घेवून वाटचाल केली तर भोंदुगिरीस बळी पडले जात नाही. विज्ञानाशिवाय शक्य नाही. विज्ञानाने भारतीय आवकशान यान यशस्वी सोडले. विज्ञानाने देशाची प्रगती होते. जो देश विज्ञानाची साथ घेवून शस्त्रात संपन्न आहे. ज्याच्याकडे अत्याधुनिक हत्यारे आहेत त्यालाच जग भिती. हे ओळखून नागरिकांनी चालले पाहिजे. भोंदुगिरीस नागरिकांनी उघडे पाडून त्याचे कृत्यास प्रतिबंध घातला पाहिजे होता. आजूबाजूच्या जनतेला खरातचे कारनामे समजले असतील, मात्र बडी मंडळी त्याच्या सोबत असल्याने घाबरणारे बरेच आहे. त्यामुळे हे प्रकरण जनतेनी धाडसाने उघडे पडले आहे. वास्तविक सोप्या मराठीत संत गाडगेबाबा यांनी भोंदुबाबाला ओजस्वी भजनातून उघडे पाडले आहे. अनेक राष्ट्रीय संतानी भोंदुगिरीस उघडे पाडले आहे. तरी महिला फसत आहेत. माता जिजाऊ, झाशीची राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले असे शकडोंच्या संख्येने महिलांनी सावध केले. शुरवीर बनविले. तरी महिला अज्ञाला बळी पडत आहेत. वास्तविक खरात एक नाहीत असे किती तरी खरात सारखे आपल्या देशात, राज्यात वावरत असतील, ते महिलांना लुबाडू पाहात आहेत. महिलाशक्ती मोठी आहे. महिला ताकदीसमोर सर्व नगण्या आहे. दुर्गा, जगदंबा आदि नावे ठेवतो. त्यामुळे महिलांनी आपल्या पुर्वज महिलेचा आपमान होणार नाही असे वागले पाहिजे. नीच माणसाच्यावृत्तीला बळी पडले जावु नये. खरात तो आपल्या कर्माचे फळे भोगले, शिक्षा होईल किंवा नाही मात्र ज्यांचे आयुष्य बदबाद झाले ते पुन्हा मिळेल का? त्यामुळे महिलांनी सावध चालले पाहिजे. आता भोंदुगिरीची कमतरता नाही तर सावध वागण्याची गरज आहे. खरात सारखे पुन्हा निर्माण होवू नये यासाठी जनतेनी सावधगगिरी बाळगण्याची गरज आहे. फसविणारे अनेक निर्माण होतील आपण सावध वागले पाहिजे. ईश्वराने सर्वाधिक बुद्धी माणसाला दिली आहे. त्याचा उपयोग करून घेतला पाहिजे. फसविणारे जागो-जागी मिळतील, मात्र नागरिकांनी फसू नये. उघडे पाडले पाहिजे. त्यामुळे खरात सारखे पुन्हा निर्माण होणार नाहीत. दहावी नापास व्यक्ती शिकलेल्यांना वेड्यात काढू शकतो. यापेक्षा दुर्दैव दुसरे काय असू शकते. सरकार किंवा यंत्रणा काय करते, तक्रार आल्यावरच कार्यवाही करते. आपण होवून गुन्हा नोंदणी प्रकार अल्प आहेत. त्यामुळे जनतेनी सावध वागले पाहिजे. जनतेनी विचारपुर्वक चालण्यास शिकले पाहिजे. वरचेवर जमाना विचित्र होत आहे. खरात सारखी मंडळी सर्वत्र महिलांचे शोषण करणारी असेल तर ते रोखण्याचे काम नागरिकांनी केले पाहिजे. लोकशाहीत वावरताना नागरिकांचे काही कर्तव्य आहेत. ते पार पाडले पाहिजेत. विनावे सरकारला कळविले पाहिजे. शंभर वाईट असतील तरी त्यातील दोन तरी चांगले असतात. सरकारला कळवावे असे वाटणारे असतात. त्यामुळे यापुढे जनतेनी जबाबदारी स्विकारून वागले पाहिजे.

# ई-प्रशासनाचा 'लातूर पॅटर्न': आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने प्रशासन गतिमान !



**मुंबई**–महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने ३० मे २०२५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये, राज्यातील प्रशासकीय कार्यक्षमता वृद्धिंगत करण्यासाठी '१५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा' कार्यक्रम अत्यंत महत्त्वाकांक्षी स्वरूपात कार्यान्वित करण्यात आला. शासकीय कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान, तंत्रज्ञानाधिष्ठित आणि प्रामुख्याने सर्वसामान्य नागरिकाभिमुख करणे हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट होते. या विशेष मोहिमेअंतर्गत लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध अंमलबजावणी करत, राज्यातील पहिल्या पाच उत्कृष्ट जिल्ह्यांमध्ये स्थान पटकाविले आहे. लातूर जिल्ह्याने तंत्रज्ञानाचा वापर केवळ कार्यालयीन कामकाजापुरता मर्यादित न ठेवता तो थेट जनसामान्यांना जलद सेवा देण्यासाठी केला. या विशेष कामगिरीची दखल घेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज (२८ मार्च) जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचा सन्मान करण्यात आला.

लातूर जिल्ह्यात १ जून २०२५ पासून '१५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा' कार्यक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू करण्यात आली, ज्यामध्ये प्रामुख्याने सर्वसमावेशक संकेतस्थळ संरचना, सेवा हमी कायदा व आपले सरकार पोर्टलवरील सेवांना गती देणे, आणि संपूर्ण कार्यालयीन कामकाजात 'ई-ऑफिस' प्रणालीचा शंभर टक्के वापर करण्यावर विशेष भर देण्यात आला. प्रशासकीय गतिमानतेसाठी डेटा डॅशबोर्डची निर्मिती करून कामकाजाचे 'रिअल-टाइम मॉनिटरिंग' करणे, व्हॉट्सप चॅटबॉटद्वारे नागरी सेवांचे सुलभीकरण करणे, कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) नाविन्यपूर्ण वापर तसेच जीआयएस व रिमोट सेन्सिंग यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रशासकीय कामकाजात अंतर्भाव करणे यांसारख्या बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात आले. या व्यापक प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी प्रत्येक विषयानुसार स्वतंत्र नोडल अधिकारी, सहाय्यक नोडल अधिकारी आणि तांत्रिक मनुष्यबळाची नियुक्ती करून कामाचे विकेंद्रीकरण करण्यात आले होते. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी या सर्व यंत्रणेचा स्वतः साप्ताहिक आढावा बैठकांमध्ये प्रत्येक पॅरामीटरवर सूक्ष्म संनियंत्रण केले, तर राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र (एनआयसी) आणि जिल्हा माहिती तंत्रज्ञान कक्ष (डीआयटी सेल) यांच्यातील प्रभावी समन्वयामुळे अंमलबजावणीत येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे निराकरण तत्काळ करणे शक्य झाले.

लातूर जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळाची (latur.gov.in) संरचना पूर्णतः बदलून ती अधिक सुरक्षित आणि 'युझर फ्रेंडली' करण्यात आली असून, 'पेज स्पीड इनसाईटस'नुसार २.८ सेकंदाचा विक्रमी वेग गाठणारे हे पोर्टल 'गव्हर्नमेंट क्लाउड'वर होस्ट करण्यात आले आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, 'भाषिणी एआय' या प्रगत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संकेतस्थळावरील माहिती तब्बल २३ भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली असून, आजवर ५ लाखाहून अधिक नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे. हे संकेतस्थळ WCAG २.१ जागतिक मानकांनुसार आणि सायबर सिक्युरिटी ऑडीटसह विकसित केल्यामुळे ते दिव्यांग व्यक्तींसाठी सुलभ व सायबर हल्ल्यांपासून पूर्णतः सुरक्षित झाले आहे.

नागरिकांना विहित कालमर्यादेत सेवा पुरवणे हा या मोहिमेचा मूळ गाभा असल्याने, सेवा हमी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करत प्राप्त ४ लाख ९२ हजार ६२९ अर्जांपैकी ४ लाख ८२ हजार ४२५ अर्जांचा निपटारा करण्यात आला. अहवाल कालावधीतील ९७.९३ टक्के इतकी विक्रमी निपटारा टक्केवारी गाठतानाच, अधिसूचित १८ दिवसांच्या मर्यादेऐवजी सरासरी ७ ते १० दिवसांतच सेवा वितरण करण्यात आले, ज्यामुळे अपीलाचे प्रमाण केवळ ०.०६९ टक्के इतके नगण्य राहिले.

प्रशासकीय कामकाजात संपूर्णतः 'पेपरलेस' पद्धती आणण्यासाठी लातूर जिल्हाधिकारी कार्यालयापासून तहसील स्तरापर्यंत ३७१ नोंदणीकृत वापरकर्त्यांच्या माध्यमातून ई-ऑफिसचा १०० टक्के वापर करण्यात आला असून, या काळात सुमारे २ लाख फाईल्सचे डिजिटल हस्तांतरण यशस्वीपणे पार पडले. 'शासकीय प्रक्रिया पुनर्रचना' अंतर्गत फाईल प्रक्रियेचे अनावश्यक टप्पे कमी केल्याने निर्णयांचा वेग लक्षणीयरीत्या वाढला असून 'लुकर स्टुडीओ' आधारित डॅशबोर्डमुळे ९२ विविध शासन योजनांचे प्रगती अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना एका क्लिकवर उपलब्ध झाले आहेत. यासोबतच, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साधनांचा वापर वाढवण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर विशेष कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले, ज्यामुळे कार्यालयीन मसुदे अधिक अचूक होऊन वेळेची मोठी बचत झाली.

व्हॉट्सप चॅटबॉटच्या माध्यमातून ५० शासकीय सेवा थेट नागरिकांच्या मोबाईलवर उपलब्ध करून देण्यात आल्या असून, यामुळे तक्रार नोंदवणे आणि अर्जाची स्थिती तपासणे सोपे झाले आहे. तसेच, जिल्ह्यातील ६,०९४ मालमत्तांचे डिजिटल मॅपिंग पूर्ण करून भौगोलिक माहिती प्रणालीच्या (GIS) आधारे आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम करण्यात आली आहे. लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने राबविलेल्या या सर्वंकष उपक्रमांचे 'क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया' या संस्थेमार्फत मूल्यमापन करण्यात आले. तांत्रिक क्षमता आणि अंमलबजावणीत दाखवलेले सातत्य यामुळे लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाचा राज्यातील सर्वोत्कृष्ट पाच जिल्ह्यांमध्ये समावेश झाला. योग्य नियोजन आणि तंत्रज्ञानाचा मानवी चेहरा ओळखून केलेला वापर यामुळे लातूर जिल्ह्याने राबविलेले उपक्रम आधुनिक आणि पारदर्शक प्रशासनासाठी उपयुक्त ठरले आहेत.

**– तानाजी घोलप,**
**प्र. जिल्हा माहिती अधिकारी,**
**लातूर**

## गुन्हेगारी कायदा आणि मानसिक आरोग्य: एक चिकित्सक अभ्यास...

प्रस्तावना

भारतीय फौजदारी कायद्याचा मुख्य आधार 'मेन्स री' (Mens Rea) म्हणजेच 'गुन्हेगारी हेतू' या तत्त्वावर अवलंबून आहे. कायदा असे मानतो की प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या कृत्याचे परिणाम समजण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता असते. मात्र, मानसिक आजार असलेल्या व्यक्तींच्या बाबतीत ही धारणा बदलू शकते.

स्किझोफ्रेनिया, बायपोलर डिसऑर्डर यांसारख्या गंभीर आजारांमुळे व्यक्तीला आपल्या कृत्याचे स्वरूप किंवा ते कायद्याने चुकीचे आहे हे समजत नाही. कायदेशीर चौकट आणि आव्हाने भारतीय दंड संहिता (IPC) चे कलम ८४ वेडेपणाच्या बचावाचे (Insanity Defence) प्रावधान करते. हे १८४३ च्या 'मॅकनॉटन' (M'Naghten) केसवर आधारित असून त्यात केवळ 'बौद्धिक अक्षमते'वर लक्ष केंद्रित केले आहे. आधुनिक मानसोपचार शास्त्रानुसार केवळ बुद्धीच नाही, तर भावना आणि इच्छाशक्तीवरील नियंत्रण सुटणे देखील मानसिक आजाराचे भाग आहेत, ज्याची दखल सध्याचा कायदा पूर्णपणे घेत नाही. वैद्यकीय विरुद्ध कायदेशीर वेडेपणा लेखानुसार 'वैद्यकीय वेडेपणा' (Medical Insanity) आणि 'कायदेशीर वेडेपणा' (Legal Insanity) यामध्ये मोठी तफावत आहे. एखादी व्यक्ती वैद्यकीयदृष्ट्या आजारी असली तरी, जोपर्यंत ती कलम ८४ च्या अत्यंत कठोर अटी पूर्ण करत नाही, तोपर्यंत तिला कायदेशीर संरक्षण मिळत नाही. यामुळे अनेक खऱ्या मानसिक रुग्णांवर अन्याय होण्याची शक्यता असते.

मानसिक आरोग्य संरक्षण कायदा, २०१७ चा 'मानसिक आरोग्य संरक्षण कायदा' हा मानवाधिकार आणि सन्मानावर आधारित एक प्रगत पाऊल आहे. या कायद्याने आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीला गुन्हेगार न मानता ती मानसिक तणावाखाली असल्याचे मान्य केले आहे.

तरीही, फौजदारी न्यायव्यवस्थेत मानसिक रुग्णांना हाताळण्यासाठी अद्याप पुरेशी यंत्रणा आणि समन्वय नसल्याचे दिसून येते. निष्कर्ष आणि सुधारणांची गरज आजच्या काळात केवळ शिक्षा देण्यापेक्षा 'सुधारात्मक आणि उपचारात्मक' (Therapeutic Approach) दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. कलम ८४ ची व्याप्ती वाढवणे: आधुनिक मानसोपचार शास्त्राचा विचार करून कायद्यात बदल करणे गरजेचे आहे. पायाभूत सुविधा: न्यायालयांमध्ये तज्ज्ञ मानसोपचारतज्ज्ञांची कमतरता दूर करून फॉरेन्सिक सुविधा वाढवणे आवश्यक आहे. मानवी हक्क: मानसिक आजार असलेल्या आरोपींना सन्मानाने वागवणे आणि त्यांच्या उपचारांची जबाबदारी घेणे हे संविधानात्मक मूल्यांना धरून आहे. थोडक्यात सांगायचे तर: न्यायव्यवस्थेने मानसिक अक्षमता समजून न घेता दिलेली शिक्षा ही न्याय्य ठरू शकत नाही.

**लेखिका: सूर्यवंशी वैशाली रामचंद्र**
**(एलएल.एम. प्रथम वर्ष)**
**मार्गदर्शक: सहाय्यक प्राध्यापक**
**ओमप्रकाश जाधव,**
**दयानंद विधी महाविद्यालय, लातूर**

## येथे मानसिक आरोग्य आणि कल्याणाचे समाजशास्त्रीय पैलू या शोधनिबंधाचा मानसिक आरोग्य आणि कल्याणाचे समाजशास्त्रीय पैलू...

१. प्रस्तावना

पारंपारिकपणे, मानसिक आरोग्याकडे बायोमेडिकल (biomedical) दृष्टिकोनातून पाहिले जाते, जे केवळ वैयक्तिक व्याधी, अनुवंशिकता आणि रासायनिक असंतुलनावर लक्ष केंद्रित करते. तथापि, वेगवेगळ्या सामाजिक गटांमध्ये दिसणाऱ्या मानसिक आजारांच्या व्यापक स्वरूपाचे स्पष्टीकरण देण्यासाठी हा दृष्टिकोन अपुरा पडतो. समाजशास्त्र या मर्यादित दृष्टिकोनाला आव्हान देते आणि हे स्पष्ट करते की मानसिक आरोग्य हे सामाजिकरित्या निर्मित असते आणि त्यावर संरचनात्मक परिस्थितीचा प्रभाव असतो. समकालीन समाजात वाढता ताणतणाव.

२. मानसिक आरोग्याचे समाजशास्त्रीय सामाजिक वर्ग आणि आर्थिक असमानता: सामाजिक-आर्थिक स्थिती हा मानसिक आरोग्याचा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. निम्न सामाजिक-आर्थिक पार्श्र्वभूमी असलेल्या व्यक्तींना आर्थिक अस्थिरता, नोकरीची असुरक्षितता, खराब राहणीमान आणि आरोग्यसेवेचा अभाव यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागतो, ज्यामुळे चिंता (anxiety) आणि नैराश्याचा धोका वाढतो.

३. सामाजिक संस्थांची भूमिका

❊ ३.१ आरोग्य व्यवस्था: मानसिक आरोग्य सेवांमध्ये विषमता आहे. ग्रामीण आणि वंचित घटकांना या सेवा उपलब्ध नाहीत आणि उपचार अनेकदा महागडे असतात.

❊ ३.२ शिक्षण व्यवस्था: शैक्षणिक संस्था मानसिक जागरूकता वाढवू शकतात, परंतु शैक्षणिक दबाव आणि स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये तणाव आणि चिंता वाढत

४. कलंक (Stigma) आणि सामाजिक बहिष्कार

कलंक हा मानसिक कल्याणातील सर्वात मोठा अडथळा आहे. मानसिक आजार असलेल्या व्यक्तींना रोजगार, शिक्षण आणि नातेसंबंधांमध्ये भेदभावाचा सामना करावा लागतो. भीती आणि न्यायाच्या भीतीपोटी लोक मदत मागत नाहीत, ज्यामुळे एक दुष्टचक्र तयार होते.

निष्कर्ष

मानसिक आरोग्य हे सामाजिक संरचना आणि सांस्कृतिक मानकांशी खोलवर जोडलेले आहे. केवळ बायोमेडिकल दृष्टिकोन या समस्येचे निराकरण करू.

**लेखीक: कु. श्रद्धा अनंतराव कुलकर्णी**
**एलएल.एम. प्रथम वर्ष**
**मार्गदर्शक: सहाय्यक प्राध्यापक**
**ओमप्रकाश जाधव**
**दयानंद विधी महाविद्यालय, लातूर**

## रेणापूर नगरपंचायतीच्या सक्शन मशीनचे आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते लोकार्पण

**लातूर/प्रतिनिधी** :स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत रेणापूर नगरपंचायतीला राज्य शासनाकडून मिळालेल्या सक्शन मशीनचा भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते शुक्रवारी लोकार्पण करण्यात आले.



राज्य शासनाच्या वतीने स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत मागील काळात बांधकाम केलेल्या घरासह विविध इमारतीतील दुरावस्था झालेल्या अथवा भरलेल्या शौचालय टँकचा उपसा करण्यासाठी रेणापूर नगरपंचायतीला तब्बल १८ लाखाची सक्शन मशीन नुकतीच प्राप्त झाली आहे.

सदर सक्शन मशीनचे भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा श्रीमती शोभाताई शामराव आकनगिरे, पंचायत समितीच्या सभापती सौ. मोनिका सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, नगरपंचायत पाणीपुरवठा सभापती दत्ता सरवदे, स्वच्छता निरीक्षक मेहमूद शेख, मारूफ आत्तार, विजय चव्हाण, महेश गाडे, चंद्रकांत कातळे, राजाभाऊ आलापुरे, उत्तम चव्हाण, शेख अजीम, अच्युत कातळे, गणेश चव्हाण, धम्मानंद घोडके, ईश्र्वर बद्दर, हनुमंत भालेराव, योगेश राठोड, रमेश चव्हाण, मनोज चक्रे, परमेश्र्वर मोटेगावकर, सोपान सातपुते, शेख शौकत यांच्यासह अनेक जण होते.

## प्रभावी संवाद कौशल्य व्यक्तिमत्त्व विकासाची भक्कम पायाभरणी असते : डॉ. जयद्रथ जाधव

**लातूर/प्रतिनिधी :** भाषा ही विद्यार्थ्यांच्या आत्मविकासाचे पहिले साधन असून, प्रभावी संवाद व वक्तृत्व कौशल्यासाठी अवांतर वाचनाबरोबरच चिंतन करणे आवश्यक आहे. व्यक्तिमत्व विकासाची पायाभरणी ही प्रभावी संवादावर आधारित असते असे प्रतिपादन डॉ जयद्रथ जाधव यांनी केले. भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर यांच्या वतीने संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबीर' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या शिबिरात प्रभावी संवाद कौशल्य आणि वक्तृत्व कला या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रसंगी प्रमुख वक्ते डॉ. ज्ञानदेव राऊत (मराठी विभाग, शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी) यांनी आपल्या विस्तृत मार्गदर्शनात सांगितले की, संवाद हा केवळ माहिती देण्याचा मार्ग नसून तो व्यक्तिमत्त्व घडवण्याचा मूलभूत पाया आहे. प्रभावी संवादासाठी विचारांची स्पष्टता, भाषेवर प्रभुत्व, आत्मविश्र्वास आणि श्रोत्यांशी संवाद साधण्याची क्षमता अत्यंत महत्त्वाची आहे. युवकांनी वाचन, चिंतन आणि सतत सराव यांच्या माध्यमातून वक्तृत्व कौशल्य विकसित केले पाहिजे. आजच्या डिजिटल युगातही प्रत्यक्ष संवादाची ताकद कमी झालेली नाही; उलट योग्य संवादकौशल्य असलेला युवक समाजात नेतृत्वाची भूमिका प्रभावीपणे पार पाडू शकतो.

ते पुढे म्हणाले, वक्तृत्व ही केवळ भाषण देण्याची कला नसून ती लोकांना प्रेरित करण्याची आणि योग्य दिशादर्शन करण्याची शक्ती आहे. नेतृत्व विकसित करण्यासाठी संवादातील प्रामाणिकपणा, संयम आणि सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना डॉ. जयद्रथ जाधव (मराठी विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, रेणापूर) म्हणाले की, आजच्या स्पर्धात्मक आणि वेगवान युगात युवकांनी केवळ शैक्षणिक ज्ञानावर समाधान मानू नये, तर ते प्रभावीपणे मांडण्याची कला आत्मसात करणे गरजेचे आहे. संवाद कौशल्यामुळे व्यक्तिमत्त्वाला परिपूर्णता येते आणि नेतृत्वगुणांना योग्य दिशा मिळते. जो युवक स्पष्ट, समंजस आणि प्रभावी संवाद साधू शकतो, तोच समाजात विश्र्वास निर्माण करून परिवर्तन घडवू शकतो.ते पुढे म्हणाले, नेतृत्व म्हणजे लोकांना जोडण्याची कला आहे, आणि ही कला संवादातूनच विकसित होते. युवकांनी भीती, संकोच दूर करून आत्मविश्र्वासाने विचार मांडण्याची सवय लावली पाहिजे. यामुळे त्यांच्यात निर्णयक्षमता, जबाबदारीची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होते.

या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.या शिबिराच्या माध्यमातून युवक-युवतींमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्र्वास, प्रभावी संवाद कौशल्य आणि वक्तृत्व कला विकसित होण्यास मोठी चालना मिळत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## ह.भ.प. श्री. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या शुभहस्ते झाली मंदार (हरंगुळ बु.) येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना

**लातूर/प्रतिनिधी :** हरंगुळ (बु.) येथील मंदार येथे श्री हनुमान देवस्थान च्या प्रांगणात नुकतेच नवीन बांधण्यात आलेल्या श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये श्री. विठ्ठल रुक्मिणी मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना गुरुवर्य ह.भ.प. श्री. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आली.

दिनांक २५ मार्च २०२६ वार बुधवार रोजी सकाळी ११:०५ या शुभ मुहूर्तावर वेदमूर्ती श्री धनेश जोशी यांच्या शास्त्रोक्त विधि मंत्रोच्चारात श्री विठ्ठल रुक्मिणी मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

मूर्ती प्राणप्रतिष्ठापनेच्या या विधीसाठी हरंगुळचे माजी सरपंच तथा लोकाधिकार प्रमुख व्यंकटराव पनाळे, विष्णुदास पाटे, नामदेव कैले, राजीव पनाळे, विनोद तीगीले, सुधाकर चामे, राम तिगीले, हरिश्चंद्र बरुरे, श्याम बरुरे, उद्धव बरुरे, रमेश शेळके यांच्यासह एकूण अकरा जोडपे पूजेसाठी बसले होते.

मूर्ती प्राणप्रतिष्ठापना झाल्यानंतर ह.भ.प. श्री. गहिनीनाथ महाराज औसेकर यांचे कीर्तन संपन्न झाले.

# इंधन टंचाईपासून सुटका?

आखाती देशातून होणारा खनिज तेलाचा पुरवठा विस्कळीत झाल्याने रशियाकडून तेल खरेदीच्या सवलतीसाठी भारताने अमेरिकेपुढे प्रस्ताव ठेवला आहे. त्यावर अमेरिकेचा काय प्रतिसाद राहील ते पाहायचे.

इराणने भारतासह पाच देशांना होर्मुझची सामुद्रधुनी जहाज वाहतुकीसाठी खुली केल्याने या मार्गाने होणारा तेल आणि नैसर्गिक वायुचा पुरवठा काही प्रमाणात सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

पश्चिम आशियातील युद्ध परिस्थितीमुळे गेले काही दिवस देशात इंधन टंचाईची स्थिती निर्माण झाली आहे. केंद्र सरकार इंधनाची स्थिती चिंताजनक नसल्याची ग्वाही देत असले तरी अफवांमुळे अनेक ठिकाणी गॅस आणि पेट्रोलची कृत्रिम टंचाई निर्माण झाल्याचे चित्र आहे. या युद्धाचा फटका जागतिक अर्थव्यवस्थेलाही बसत आहे. पेट्रोल डिझेलचा पुरवठा धीम्या गतीने होत असल्याने आणि समाज माध्यमांवर इंधनटंचाईच्या अफवांमुळे नागरिकांनी पेट्रोल पंपांवर गर्दी केल्याचे चित्र दिसत आहे. कोल्हापूर, सोलापूर, गोंदिया जिल्ह्यांत पेट्रोल पंपावर लांबच लांब रांगा आणि पेट्रोल डिझेल संपल्याचे फलक लागल्याच्या



आहे. देशात साठ दिवस पुरेल इतका तेलसाठा असल्याचे निवेदन केंद्र सरकारने परवा केले आहे. आठ लाख टन गॅसचा पुरवठाही सुरक्षित असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे सध्यातरी नागरिकांनी भयभीत होऊन अकारण साठेबाजी करण्याची गरज नाही. देशाची एकूण इंधन साठवण क्षमता ७४ दिवसांची आहे. गेल्या आठवड्यात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून आलेल्या दोन जहाजांमुळे इंधन पुरवठा काही प्रमाणात सुरळीत होण्यास मदत झाली आहे. जेव्हा सरकार साठा भरपूर आहे असे सांगते तेव्हा तो साठा मोठ्या बंदरांवर, तेल कंपन्यांच्या टाक्यांत किंवा पाइपलाइनमध्ये असू शकतो.

प्रत्यक्षात आपल्या शहरातील पेट्रोलपंपावर उपलब्ध नसू शकतो, वाहतुकीची साखळी विस्कळीत झाल्यानेही किंवा अन्य अडथळ्यांमुळेही

बातम्या आहेत. काही पेट्रोलपंपांवर तर विशिष्ट प्रमाणातच पेट्रोल दिले जाते. स्वयंपाकासाठी लागणार्या गॅसबाबतही असेच चित्र दिसते. नाशिकमध्ये गेल्या महिन्याच्या दीडपट पेट्रोल, डिझेलची मागणी वाढल्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले आहे. मागणी वाढल्याने कृत्रिम टंचाई निर्माण झाली आहे; मात्र काही अपवाद वगळता बर्याच अंशी गॅस किंवा पेट्रोल, डिझेलचा पुरवठा सुरळीत आणि सर्वसाधारण होत असल्याचे दिसते. पेट्रोलियम मंत्रालयाने देशातील इंधन पुरवठा पूर्णपणे सुरक्षित असल्याचे सांगून जनतेला आश्वस्त केले आहे. सरकारने अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले असले तरी जनतेचा सरकारपेक्षाही अफवांवरच अधिक विश्वास असल्याचे दिसते.

**पर्यायी स्रोतांचा विचार**

गॅस सिलिंडरच्या तुटवड्याचा परिणाम छोट्या-मोठ्या व्यवसायांवर होत आहे. नागरिकही पेट्रोल, डिझेलच्या उपलब्धतेबाबत तक्रारी करीत आहेत; मात्र पेट्रोलियम मंत्र्यांनी सरकार प्रत्येक आव्हानाचा सामना करण्यास पूर्ण सज्ज असल्याचे म्हटले आहे. लॉकडाऊनची शक्यताही त्यांनी फेटाळून लावली आहे. सरकारच्या वतीने सुरळीत इंधन पुरवठ्याची ग्वाही देण्यात आल्याने नागरिकांची चिंता कमी होण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राज्यात इंधन टंचाई नसल्याची ग्वाही दिली आहे. ही बाब सकारात्मक

इंधनाचे टँकर पेट्रोल पंपावर पोहोचू शकत नाहीत. पेट्रोल डिझेल मिळणार नाही, आताच भरून ठेवा अशा मानसिकतेमुळेही गर्दी वाढून उपलब्ध इंधनसाठा संपून टंचाई निर्माण होऊ शकते. सरकारने इंधन साठा पुरेसा असल्याचे स्पष्टीकरण दिले असले तरी त्याची आकडेवारी देशाच्या एकूण स्थितीची असते; मात्र प्रत्यक्षात ग्राहकांना जाणवणारी टंचाई ही स्थानिक वितरणाची समस्या असते. ही तफावत दूर करण्यासाठी प्रशासकीय नियंत्रण आणि सुरळीत वाहतूक व्यवस्था असणे आवश्यक आहे. नागरिकांनीच घाबरून जाऊन गरजेपेक्षा अधिक साठा न करणे शहाणपणाचे. जोवर परिस्थिती निवळत नाही तोवर इंधन बचतीचे मार्ग अवलंबावे लागतील. यासाठी सार्वजनिक वाहतुकीचा वापर केल्यास वैयक्तिक इंधनांची बचत होईल; मात्र त्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही चोख राहील याची स्थानिक प्रशासनाने काळजी घ्यायला हवी. इंधनाचे साठे-मर्यादित असल्याने पर्यायी इंधनाचे स्रोत वापरणे हाच यापुढील काळात योग्य पर्याय ठरणार आहे.

## हाडांच्या कर्करोगाची प्रमुख लक्षणे

हाडांच्या कर्करोगाची प्रमुख लक्षणे म्हणजे प्रभावित हाडात सतत होणारी वेदना, जी रात्री वाढते, हाडांजवळ सूज किंवा गाठ येणे, हाडे कमकुवत होऊन क्षुल्लक कारणाने फ्रॅक्चर होणे, थकवा आणि वजन कमी होणे अशी लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

हाडांच्या कर्करोगाची मुख्य लक्षणे हाडात वेदना (इेपश झरळप): हे सर्वात सामान्य लक्षण आहे. सुरुवातीला वेदना अधूनमधून होते, पण नंतर ती तीव्र आणि सतत होते सूज किंवा गाठ: वेदना होत असलेल्या भागाच्या आसपास सूज येणे किंवा हाडावर कडक गाठ जाणवणे हाडे कमकुवत होणे: ट्यूमरमुळे हाड कमकुवत होते, ज्यामुळे साध्या पडण्याने किंवा हलक्या दुखापतीने हाड मोडू शकते (फ्रॅक्चर) हालचालीस अडथळा जर ट्यूमर सांध्याजवळ असेल, तर सांध्याची हालचाल करणे कठीण होते रात्रीच्या वेळी वेदना वाढणे: हाडांचा कर्करोग असल्यास वेदना रात्रीच्या वेळी जास्त त्रासदायक होते इतर लक्षणे: कारण नसताना वजन कमी होणे, सतत थकवा जाणवणे आणि क्वचित वेळी ताप येणे



**डॉक्टरांना केव्हा भेटावे?**

जर तुम्हाला हाडांमध्ये सतत वेदना होत असेल, सूज दिसत असेल किंवा काहीही कारण नसताना हाड दुखापत असेल, तर त्वरित अस्थिरोगतज्ज्ञ किंवा कॅन्सर तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा

## रविवार विशेष

# सामान्य जनतेवर महागाईचा घाव..!

अमेरिका, इस्रायल व इराण यांच्यातील युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होऊन खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचे दर भडकले आहेत. इंधन दरवाढीचा परिणाम केवळ वाहतुकीपुरता मर्यादित राहत नाही, तर उत्पादन खर्च वाढल्याने सर्वच वस्तूंच्या किमतींमध्ये तो झिरपत जातो. त्यामुळे वाढती महागाई सामान्यांच्या रोजच्या जगण्यावर घाव घालते.

आखाती देशांमधील युद्धाचा धुरळा केवळ त्या प्रदेशापुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करतो. पश्चिम आशियात तणाव वाढला, की सर्वप्रथम हादरा बसतो तो जागतिक बाजारपेठांना. अनिश्चिततेमुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास ढासळतो आणि शेअर बाजारातील घसरणीत त्याचे थेट प्रतिबिंब दिसून येते. गेले काही दिवस जगभरातील प्रमुख श्शेअर बाजारात घ्घसरण झाली . अशा स्थितीत भांडवल सुरक्षित ठिकाणी वळते आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमधून निधीची माघार सुरू होते. भारतासारख्या विकसनशील देशासाठी ही परिस्थिती अधिक आव्हानात्मक ठरते.

ताज्या युद्धाचा सर्वात मोठा परिणाम झाला तो ऊर्जा क्षेत्रावर. जागतिक व्यापारावरही मोठा परिणाम झाला आहे. शेतीमालाच्या आयात-निर्यातीतील अडथळ्यांमुळे अन्नधान्याच्या किमतीत चढ-उतार वाढले. अनेक देशांनी आपल्या देशांतर्गत गरजा भागवण्यासाठी निर्यात निर्बंध लागू केले, तर काहींनी आयातीवर अवलंबित्व वाढवले. या बदलांचा परिणाम भारतासारख्या देशांवर झाला. भारताची काही कृषी उत्पादने निर्यातीवर अवलंबून आहेत, तर काही आयातीवर.

भारतातून शेतीमाल निर्यात होत नसल्याने केळी, द्राक्ष, साखर, तांदूळ आदींच्या भाववर परिणाम झाला. परिणामी, शेतकर्यांपासून ग्राहकांपर्यंत सर्वच स्तरांवर अस्थिरता निर्माण झाली. खतांच्या किमतीत झालेली वाढ ही आणखी एक गंभीर बाब आहे. रशिया-युक्रेन संघर्षानंतर आधीच खतांच्या पुरवठ्यावर ताण होता, त्यात आखाती युद्धामुळे ऊर्जा दर वाढल्याने खत उत्पादन खर्चही वाढला. याचा थेट परिणाम शेतीच्या खर्चावर झाला आणि शेवटी अन्नधान्याच्या किमती वाढण्यास हातभार लागला.

दरम्यान, भारतीय रुपयानेही डॉलरपुढे लोटांगण घातले. याचा थेट परिणाम भारताच्या आयातीवर झाला.ख्खनिज तेल, गॅस, यंत्रसामग्री यासारख्या आयातीत वस्तू महागल्या. त्यामुळे देशांतर्गत उत्पादन खर्च वाढला. हा वाढलेला खर्च शेवटी ग्राहकांच्या खिशातूनच वसूल होतो. महागाईच्या या झटक्याने सामान्य माणसाचे कंबरडे मोडले आहे. अन्नधान्य, इंधन, वीज, घरगुती गॅस अशा सर्वच आवश्यक वस्तू महागल्याने कुटुंबांचे बजेट कोलमडले आहे. मध्यमवर्गीय आणि कनिष्ठ वर्गीय कुटुंबांसाठी ही परिस्थिती अधिक बिकट ठरली आहे. बचतीचा दर कमी झाला असून, खर्चाचा ताण वाढला आहे. गॅस मिळत नसल्याने हॉटेल व्यवसायासह अनेक उद्योगांना फटका बसला . खर्च वाढला आणि काही ठिकाणी व्यवसाय बंद करण्याची वेळ आली.लघु आणि मध्यम उद्योगांवर याचा सर्वाधिक परिणाम झाला आहे. उत्पादन घटल्याने




रोजगाराच्या संधी कमी झाल्या आणि बेरोजगारीचा प्रश्न अधिक तीव्र झाला. आखाती देशांतील युद्धाचा परिणाम आता थेट सर्वसामान्य नागरिकांच्या स्वयंपाकघरावर दिसू लागला आहे. एलपीजी गॅस सिलिंडरचा तुटवडा असल्याने अनेक कुटुंबांनी स्वयंपाकासाठी पुन्हा पारंपरिक कोळसा शेगडीचा पर्याय स्वीकारण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांमध्ये कोळशाच्या मागणीत लक्षणीय वाढ झाली असून त्याचे दरही वाढले.

खनिज तेलातून इथिलीन, प्रोपीलीन (पेट्रोकेमिकल्स) सारखे उपपदार्थ मिळतात. त्यातून प्रामुख्याने वेष्टनासाठीचे (पॅकिंग) प्लास्टिक तयार केले जाते; पण युद्धामुळे तेल आयातीत मोठी घट झाल्यामुळे दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या वेष्टनाच्या प्लास्टिकचा तुटवडा निर्माण होऊन दर दुप्पट झाले आहेत. थेट शेतकरी, ग्राहकांसह दूध उद्योगाला युद्धाच्या झळा बसणार आहेत. युद्धापूर्वी एक लिटर दुधाच्या वेष्टनासाठी ८५ ते ९० पैसे खर्च येत होता. आता तो १.५० रुपये ते १.८० रुपयांवर गेला आहे. शिवाय वेष्टनासाठी लागणार्या प्लास्टिकसह अन्य कच्च्या मालाचे दर वाढत आहेत. वेष्टनासाठीच्या कच्चा मालाचा पुरवठा करणार्या कंपन्या यापूर्वी एका महिन्यासाठी लागणार्या कच्चा मालाच्या खरेदीची अगाऊ नोंदणी घेत होते. आता चार चार दिवसांची आगाऊ नोंदणी करावी लागत आहे. या मालाच्या वाहतूक खर्चात मोठी वाढ झाली आहे.

अनेक दूध संघांची स्वतःची वेष्टन प्रक्रिया केंद्रे आहेत. त्यातील काही केंद्रे गॅसवर आधारित आहेत. गॅसचा तुटवडा असल्यामुळे ही केंद्रे कधीही बंद पडू शकतात. भारतातूनआखाती देशांना दूध भुकटी आणि बटरची निर्यात होते. युद्ध सुरू झाल्यापासून आखाती देशांना होणारी निर्यात पूर्णपणे बंद झाली आहे. त्यामुळे दूध भुकटीच्या दरात घसरण झाली आहे. उन्हाळ्यात दूध उत्पादनात घट होते, अशा काळात दुधाच्या दरात वाढ होऊन शेतकर्यांना प्रति लिटर एक-दोन रुपये जास्त मिळतात. त्यामुळे चारा आणि पाणी टंचाईवर मात करणे सोयीचे होते; पण यंदा युद्धामुळे दुधाच्या दरात वाढ होण्याची शक्यता नाही. दुधाच्या पावडरचे दर प्रति किलो २७० ते २७५ रुपये आणि गायीच्या दुधापासून तयार केलेल्या बटरचे दर प्रति किलो ५१० ते ५१५ रुपये आणि म्हशीच्या दुधापासून तयार केलेल्या बटरचे दर ४८० रुपयांवर स्थिर आहेत. भारतासाठी हे युद्ध आर्थिक आणि राजनैतिक अशा दोन्ही आघाड्यांवर नवे आव्हान निर्माण करणारे ठरत आहे. देशाच्या गरजेपैकी सुमारे ८५ ते ९० टक्के खनिज तेल आयात करावे लागते.नैसर्गिक वायू आणि एलपीजीसाठीही आपण मोठ्या प्रमाणात आखाती देशांवर अवलंबून आहोत. सौदी अरेबिया, इराक, संयुक्त अरब अमिरात आणि कतारसारख्या देशांकडून भारताला मोठ्या प्रमाणावर ऊर्जा पुरवठा होतो. खनिज तेल व गॅसचे दर वाढल्याने भारताला आयातीवर जास्त खर्च करावा लागणार आहे.अमेरिकेने रशियाकडून तेलखरेदीची सवलत दिली असली, तरी ती मर्यादित कालावधीसाठी आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर सध्या १५० डॉलर प्रति पिपांच्या घरात आहेत. काही महिन्यांपूर्वीच्या रशियाकडून सवलतीत आयात केलेल्या ख्खनिज तेलाच्या तुलनेत आता दुप्पट दर मोजावा लागत आहे. रशिया आणि इराणच्या अगोदरच भरलेल्या जहाजातील कच्चे तेल घ्यायला अमेरिकेने परवानगी दिली असली, तरी हा तात्पुरता दिलासा आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जहाजे बाहेर पडत नाहीत, तोपर्यंत तेलसंकट दूर होणार नाही. पुढचा एक महिना परिस्थिती अशीच राहिल्यास ख्खनिज तेलाचे दर १८० डॉलर प्रति पिंप होऊ शकतात, अशी भीती सौदी अरेबियाने व्यक्त केली आहे. भारत कतारकडून मोठ्या प्रमाणात गॅस आयात करतो. इराणच्या हल्ल्यामुळे झालेले त्या प्रकल्पांचे नुकसान भरून काढण्यासाठी पाच वर्षे लागतील, असे कतार कडून सांगण्यात येत असल्याने आता भारताला पर्याय शोधावे लागतील; परंतु सध्या तरी जादा दरात खनिज तेल, गॅस खरेदी करावे लागत असल्याने चालू खात्यातील तूट वाढणार हे नक्की. **प्रा.अशोक ढगे**

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा




दिवसभरात कामाच्या भानगडीत महिला आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. अनेक लोक योग, व्यायाम किंवा वॉक करत असल्या तरी एवढं पुरेसे नाही. आपल्याला योग्य आहाराची गरज देखील आहे. आहार योग्य नसल्यास शरीरात पोषक तत्त्वांची कमी राहते ज्यामुळे आजाराला आमंत्रण मिळतं. अशात वर्किंग वूमन असो वा हाउस वाइफ पर्फेक्ट डायट आपल्याला एनर्जी प्रदान करेल.ब्रेकफास्ट सकाळी आठच्या सुमारास नाश्ता करावा.ब्रेकफास्टमध्ये सांजा, ऑम्लेट, कॉर्न फ्लेक्स, ओट्स, म्यूसली यातून आपल्या आवडीप्रमाणे पदार्थ निवडणे योग्य ठरेल.

## २ Joke विनोद




साक्ष न्यायालयात टांगेवाल्याची साक्ष चालू होती. विरोधी पक्षाचा वकील त्याला प्रश्न विचारीत होता,
तू टांगा हाकतोस ना?
नाही साहेब
आता मात्र हद्द झाली तुझी! शपथ घेऊन सांग तू टांगा हाकत नाहीस म्हणून!
अगदी शपथपूर्वक सांगतो की मी टांगा हाकत नसून टांग्याचा घोडा हाकतो!

## ३ Message संदेश



Sardar Aur Pathan K Beech Me Fight Ho Rahi Thi..
Sardar: Saale Me Tere Kapde Phaad K Tujhe Nanga Ker Dunga. Pathan: Dekho Yara, Serious Ladai Me Romantic Baat Mat Kero Warna Hamara Mood Ban Jayega.. ..

## ४ Thought सुविचार




धर्म हे स्वत:च (बौद्धिक) पावित्र्यविडंबने आहेत.
– केदार जोशी

**संस्कृत सुभाषित**

**अपमान होई अति परिचये, अनादर तो अति जाण्याते,**
**मलय पर्वतावरी भिल्ल स्त्री चंदनतरूचे जळण करी ।।**

अर्थ : अति परिचयामुळे अपमान होतो, सतत जाण्यामुळे अनादर होतो. जसे मलय पर्वतावरील भिल्लसुंदरी चंदन वृक्षाच्या झाडाचा जळण म्हणून उपयोग करते तशी गत होते. पण जेथे चंदनानीच जंगले भरलेली तेथे सरपणासाठी त्याचा उपयोग होतो, हे अति परिचयामुळेच होते.

# मनोरंजक महाशब्दकोडयांचा समाचार



### आडवे शब्द

१. बाथरूमला मराठी शब्द
४. निवाड्याचा कागद
७. इंद्रिय
१०. सतत भटकणारा
१२. दक्ष, सतर्क
१३. वर्ष, साल
१४. शंकर
१५. अक्षरापुढील रेघ
१६. वाणी, बोलणे
१८. हद्द
१९. तारणारा
२०. आई-वडील
२२. नमस्काराचा शब्द
२५. घृत, कढवलेले लोणी
२६. दु:खद स्थितीतून सुटका झाल्याबद्दल आनंद होणे
२९. मेळावा
३१. सर्प
३२. अपशकुन
३४. बांगला रुपया
३६. शरीरावर उमटलेली माराची खूण
३७. बढाई, बडबड
३८. चंदन उगाळण्याचा दगड
४०. साप्ताहिक सुट्टीचा दिवस
४२. विजयी, कीर्तीमान, यशस्वी
४३. मामाची बायको
४४. शपथ
४६. वडिलधाऱ्यांना पत्रात लिहिण्याचा मायना
४८. कडक कवचाचे गोल फळ
४९. निर्धन
५०. नवरदेव
५२. नशा आणणारे आंबट पेय
५३. चोऱ्या करणारा
५५. बेकरीतील एक गोड पदार्थ
५७. अवकाशयात्री
५९. खोकल्याची उबळ
६१. सोनेरी रंगाचे धान्य
६२. थंडीने गार पडणे
६३. पोथी गुंडाळण्याचे कापड
६४. शर्त
६५. बाळभाषेत पाणी
६६. मोठी कळशी
६८. शेवट, अस्त
६९. अखंड
७०. नाकानी हुंगण्याची तंबाखू
७२. वार्ताहर
७५. घाण
७६. कुबड
७७. घोंगड्या विणणारा
७८. जुगार

### उभे शब्द

२. नूतन
३. मावळ्यांची एक घोषणा
४. आकार नसलेला
५. इच्छा
६. अनुमती
७. हिंमत, धैर्य-बहुदा उसने
८. खून
९. अखबार
११. मृत्यू
१३. अंगरखा
१७. चक्र
१९. चांदणी
२१. अधिक यातना होतील असे वागणे-बोणे (वा.प्र.)
२३. मनाला आलेला थकवा
२४. झीज, नुकसान
२७. सेनापती
२८. रस्ता, सडक
३०. नटणारा
३१. न आवडणाऱ्या व्यक्तीच्या चांगल्या कामातही दोस दिसतात (म्हण)
३३. चाळीस शेर
३५. नवरा (ग्रा.)
३८. मित्र, भिडू
३९. हस्त, कर
४१. घोडा
४३. जादू, भ्रम
४५. दफनभूमी
४७. वारा
४९. अफवा
५१. दागदागिने
५२. मोठी बहीण
५४. दही घुसळण्याचे साधन
५५. चौक
५६. कापडाला घातलेली शिवण
५७. मंगळवारी येणारी चतुर्थी
५७अ. जरचा जोडीदार
५८. कडक (केस)
६०. उथळ, मोठी वाटी
६५. साडी
६६. घात करणारे
६७. कंडी, थाप
६८. तफावत, भेद
६९. विषमाच्या विरुद्ध
७१. फळातील द्रव
७२. बगीचा
७३. गुलाम, सेवक
७४. धपाटा

### आडवे उत्तरे

१.स्नानगृह ४.निकालपत्र ७.अवयव १०.रमताराम १२.सावध १३.सन १४.हर १५.काना १६.वाचा १८.सीमा १९.तारणहार २०.जनकजननी २२.रामराम २५.तूप २६.हायसे वाटणे २९.संमेलन ३१.नाग ३२.नाट ३४.टका ३६.वळ ३७.वल्गना ३८.सहाण ४०.रविवार ४२.यशवंत ४३.मामी ४४.भाक ४६.तीर्थरूप ४८.कवठ ४९.गरीब ५०.वर ५२.ताडी ५३.चोरटा ५५.नानकटाई ५७.अंतराळवीर ५९.ठसका ६१.मका ६२.गारठणे ६३.बासन ६४.अट ६५.पापा ६६.घागर ६८.अंत ६९.सतत ७०.तपकीर ७२.बातमीदार ७५.मळ ७६.पोक ७७.सनगर ७८.सट्टा

### उभे उत्तरे

२.नवीन ३.हरहरमहादेव ४.निराकार ५.कामना ६.परवानगी ७.अवसान ८.वध ९.वर्तमानपत्र ११.मरण १३.सदरा १७.चाक १९.तारा २१.चखमेवर मीठ चोळणे २३.मरगळ २४.खोट २७.सेनानायक २८.वाट ३०.नटवा ३१.नावडतीचे मीठ अळणी ३३.मण ३५.कारभारी ३८.सवंगडी ३९.हात ४१.वारू ४३.माव ४५.कबरस्तान ४७.पवन ४९.गटारबातमी ५१.रकमपात ५२.ताई ५४.रवी ५५.नाका ५६.टाका ५७.अंगारकी ५७अ.तर ५८.राठ ६०.सट ६५.पातळ ६६.घातक ६७.गप ६८.अंतर ६९.सम ७१.रस ७२.बाग ७३.दास ७४.रट्टा




## थोडक्यात/ संक्षिप्त

### हंगामाच्या मध्यावर सनरायझर्सला मिळणार पॅट कमिन्सची साथ ?

मुंबई–आयपीएल २०२६ च्या आधी पॅट कमिन्सबाबत एक महत्त्वपूर्ण बातमी समोर आली आहे. हा ऑस्ट्रेलियन अष्टपैलू क्रिकेटपटू पाठीच्या दुखापतीतून सावरत असून, तो स्पर्धेतील सुरुवातीचे सामने खेळू शकणार नाही. मात्र, सर्व काही सुरळीत पार पडल्यास आपण आयपीएलच्या दुसऱ्या टप्प्यात आणि प्लेऑफमध्ये पुनरागमन करू शकू, अशी आशा त्याने व्यक्त केली आहे.पॅट कमिन्स पाठीच्या दुखण्याने त्रस्त आहे. ॲशेस मालिकेत केवळ एक कसोटी सामना खेळल्यानंतर, तो २०२६ मध्ये एकही सामना खेळलेला नाही. तो २०२६ च्या टी–२० विश्वचषकासाठी श्रीलंकेलाही गेला नव्हता. आयपीएल सुरू होण्यापूर्वी, कमिन्सने सांगितले होते की तो स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात आणि अंतिम सामन्यात नक्कीच खेळेल. त्याने सांगितले, मफ्मी अजूनही माझ्या पाठीच्या दुखापतीतून सावरत आहे, पण मला बरे वाटत आहे. मी नेटमध्ये गोलंदाजी करत आहे. आयपीएल लवकरच सुरू होणार आहे. मी सुरुवातीला खेळू शकणार नाही, पण जास्त वेळ लागणार नाही. सध्या मी दर तिसऱ्या दिवशी गोलंदाजी करत आहे. स्पर्धेच्या मध्यापर्यंत पूर्णपणे तंदुरुस्त होण्याची आम्ही योजना आखली आहे. आशा आहे की, काही अडचण न आल्यास, मी स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात आणि अंतिम सामन्यात खेळू शकेन.

### रोहित-विराटला झापलं, नको नको ते बोलले

मुंबई–योगराज सिंग हे त्यांच्या बेधडक वक्तव्यांसाठी ओळखले जातात. मनात जे येईल ते स्पष्टपणे बोलण्याची त्याची सवय आहे. यावेळीही त्यांनी क्रिकेटपटूंविषयी केलेल्या वक्तव्यामुळे सोशल मीडियावर मोठी खळबळ उडाली. विशेषत: माजी क्रिकेटपटूंच्या निवृत्तीमागील कारणांवर भाष्य करत त्यांनी नव्या वादाला तोंड फोडले आहे. स्वत: क्रिकेट अकॅडमी चालवणारे योगराज कडक प्रशिक्षक म्हणूनही प्रसिद्ध आहेत, याचा उल्लेख यापूर्वी युवराज सिंग यांनीही केला आहे.६८ वर्षीय योगराज सिंग यांनी म्हटले की, अनेक क्रिकेटपटू त्यांच्या करिअरला अलविदा म्हणण्यामागे पत्नी आणि मुलं ही मोठी कारणं असतात. त्यांच्या मते, खेळाडूच्या क्षमतेवर वयाचा काहीही परिणाम होत नाही. जर एखाद्या खेळाडूमध्ये खेळण्याची जिद्द आणि आवड असेल, तर तो हवे तितके दिवस खेळू शकतो.''आपली मुलं मोठी झाली आहेत...''इनसाइडस्पोर्ट्सला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितले की, भारतात ४० वर्षानंतर लोक स्वत:ला वृद्ध समजू लागतात. महिलाही ३० नंतर फिटनेसकडे दुर्लक्ष करतात आणि ''आता मुलं मोठी झाली, आपण काय करणार?'' असे म्हणतात. त्यांनी त्यांच्या जिममध्ये खास फिटनेस रूटीन सुरू केल्याचे सांगत, वयस्कर लोकांनाही तंदुरुस्त ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

### फोर्थ अंपायर मैदानात, क्लासेनला रोखले, काव्या मारनही शॉकमध्ये!

बंगळुरू–आयपीएल २०२६ च्या पहिल्याच सामन्यात कॅचवरून मोठा वाद झाला आहे. हेनरिक क्लासेनला आऊट आहे का नाही? हे पाहण्यासाठी मैदानातल्या अंपायरना थर्ड अंपायरकडे जावं लागलं आणि मॅच काही काळासाठी थांबली. एवढंच नाही तर फोर्थ अंपायरही मैदानात आला आणि त्याने ड्रेसिंग रूमच्या दिशेने चाललेल्या क्लासेनला बाऊंड्री लाईनवरच थांबवलं.सनरायजर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यात आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदार याने टॉस जिंकून पहिले बॉलिंगचा निर्णय घेतला. यानंतर हैदराबादने २९ रनवरच ३ विकेट गमावल्या, पण कर्णधार इशान किशन आणि हेनरिक क्लासेन यांच्यात महत्त्वाची पार्टनरशीप झाली. या दोघांनी हैदराबादचा स्कोअर १३.१ ओव्हरमध्ये १२६ पर्यंत नेला.१४ व्या ओव्हरच्या पहिल्याच बॉलला रोमारियो शेफर्डच्या बॉलिंगवर हेनरिक क्लासेनने मोठा शॉट मारला, पण बाऊंड्री लाईनवर उभ्या असलेल्या फिल सॉल्टने उत्कृष्ट कॅच घेतला.

**बंगळुरूने ६ गडी राखून विजय ▶ विराट कोहलीचे नाबाद ६९ धावा**

# पडिक्कलच्या अर्धशतकाच्या बळावर हैदराबादवर मिळवला दमदार विजय



**नवी दिल्ली:** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात झालेल्या सामन्यात बंगळुरूने ६ गडी राखून विजय गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने आयपीएल २०२६ स्पर्धेत चॅम्पियनसारखीच सुरुवात केली आहे. स्पर्धेतील सलामीचा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद या दोन्ही संघांमध्ये पार पडला. चिन्नास्वामी स्टेडियमवर पार पडलेल्या या सामन्यात सनरायझर्स हैदराबाद संघाला विजयासाठी २०२ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना विराट कोहली आणि देवदत्त पडिक्कलच्या दमदार अर्धशतकी खेळीच्या बळावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने ६ गडी राखून विजयाची नोंद केली आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला हा सामना जिंकण्यासाठी २०२ धावा करायचा होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाकडून विराट कोहली आणि फिल सॉल्टची जोडी मैदानावर आली. पण या संघाला हवी तशी सुरूवात करता आली नाही. सलामीवीर फिल सॉल्ट अवघ्या ८ धावा करून माघारी परतला. इम्पॅक्ट प्लेअर म्हणून फलंदाजीला आलेल्या देवदत्त पडिक्कलने दमदार फलंदाजी केली. पडिक्कलने अवघ्या २६ चेंडूत ७ चौकार आणि ४ षटकारांच्या साहाय्याने ६१ धावांची खेळी केली. त्याने विराटसोबत मिळून महत्वपूर्ण भागीदारी केली. पडिक्कल बाद झाल्यानंतर विराटने कर्णधार रजत पाटीदारसोबत मिळून भागीदारी केली. रजत पाटीदारने ३१ धावांची खेळी केली. जितेश शर्मा शून्यावर माघारी परतला. तर विराट कोहलीने ५ चौकार आणि ५ षटकारांच्या साहाय्याने ३८ चेंडूत नाबाद ६९ धावांची खेळी करून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला ६ गडी राखून विजय मिळवून दिला.

आरसीबी संघ हातावर काळी पट्टी बांधून का उतरला? काय आहे नेमकं कारण?

या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या सनरायझर्स हैदराबादने २०१ धावांपर्यंत मजल मारली. हैदराबादकडून ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्माची जोडी मैदानावर आली होती. या जोडीकडून चांगल्या सुरूवातीची अपेक्षा होती. पण ही जोडी स्वस्तात माघारी परतली.

ट्रॅव्हिस हेड अवघ्या ११ धावा करत माघारी परतला. तर अभिषेक शर्मा ७ धावा केल्या. तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या इशान किशनने ८० धावांची दमदार खेळी केली. तर हेनरिक क्लासेनने ३१ धावांची खेळी केली. शेवटी अनिकेत वर्माने ४१ धावांची खेळी करून संघाची धावसंख्या २०१ धावांवर पोहोचवली.

## जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

जळगाव–केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या ममेरा युवा भारत, जळगावफ कार्यालयामार्फत एकलव्य क्रीडा संकुल येथे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. ग्रामीण भागातील युवक–युवतींमध्ये क्रीडाविषयक आवड व जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने प्रथम तालुकास्तरावर स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यामधील विजेत्या खेळाडू व संघांना जिल्हास्तरावर सहभागी करून घेण्यात आले. या स्पर्धामध्ये कबड्डी (मुले) व खो–खो (मुली) या सांघिक स्पर्धासह १०० मीटर धावणे व गोळाफेक या वैयक्तिक क्रीडा प्रकारांचा समावेश होता.उद्घाटनप्रसंगी जिल्हा युवा अधिकारी श्री. अभिषेक चवरे यांनी प्रास्ताविकातून मयुवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठीफ मेरा युवा भारततर्फे अशा क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जात असल्याचे सांगत सर्व स्पर्धकांचे स्वागत केले. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विभागाचे संचालक डॉ. व्ही. एम. रोकडे यांनी युवकांनी क्रीडेला जीवनाचा अविभाज्य भाग बनवावा, असे आवाहन केले. कबड्डी स्पर्धेत एकलव्य मंडळ, जळगाव संघाने प्रथम क्रमांक पटकावला. आई तुळजाभवानी संघ, पाचोरा यांनी द्वितीय तर वीर जवान संघ, भडगाव यांनी तृतीय क्रमांक मिळवला.खो–खो स्पर्धेत रावेर संघ प्रथम, अमळनेर संघ द्वितीय तर जळगाव संघ तृतीय क्रमांकावर राहिला. या स्पर्धेत उत्कृष्ट संरक्षक म्हणून अनुष्का भवरे तर उत्कृष्ट आक्रमक म्हणून जान्हवी पाटील हिची निवड करण्यात आली.वैयक्तिक स्पर्धामध्ये १०० मीटर धावण्याच्या युवक गटात चेतन माळी (प्रथम), आदित्य पाटील (द्वितीय) व गौरव महाजन (तृतीय) यांनी यश मिळवले. युवती गटात प्रतीक्षा महाजन (प्रथम), आरती पाटील (द्वितीय) व सविता पाटील (तृतीय) यांनी पदके पटकावली. गोळाफेक स्पर्धेत युवक गटात आकाश धनगर (प्रथम), चेतन माळी (द्वितीय) व हर्षल पाटील (तृतीय) यांनी तर युवती गटात सुजल शुक्ला (प्रथम), रोशनी सोनार (द्वितीय) व सविता पाटील (तृतीय) यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.एकलव्य क्रीडा संकुलाचे संचालक श्रीकृष्ण बेलोरकर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी जिल्हा युवा अधिकारी श्री. अभिषेक चवरे व माय भारत, जळगावचे लेखाधिकारी श्री. सुनील पंजे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. रणजीत पाटील, युथ क्लब संचालक नितीन नेरकर, युवा स्वयंसेवक कमलेश सोनवणे व चेतन पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

## क्रीडा, कलागुणांची जोपासना आवश्यक– विभागीय आयुक्त

छत्रपती संभाजीनगर–कामकाजातील तणाव घालविण्यासाठी क्रीडा व कलागुणांची जोपासना करणे आवश्यक आहे. त्यासाठी महसूल विभागाच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांनी स्पर्धामधील आपला सहभाग वाढवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी महसूल विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना केले.

विभागीय क्रीडा संकूल येथे आज महसूल विभागाच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांना सुरुवात झाली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, अपर आयुक्त रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी (सामान्य) संगिता राठोड, संगिता सानप, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, संतोष गोरड, अरुण जऱ्हाड, नीलम बाफना तसेच सर्व उपजिल्हाधिकारी, तहसिलदार व कर्मचारी तसेच कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, आपल्या दैनंदिन जगण्यात खिलाडुवृत्तीने जगायचे असते, त्या खिलाडुवृत्तीची जोपासना अशा स्पर्धामुळे होते. त्यामुळे वातावरण सकारात्मक होऊन निकोप स्पर्धा निर्माण होते. क्रीडा व सांस्कृतिक गुणांची जोपासना ही आयुष्यात आवश्यक असते,असेही त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त पापळकर म्हणाले की, आपल्यातला गुणांचा विकास करण्यासाठी खेळा. छत्रपती संभाजीनगर विभागाला राज्यस्तरीय स्पर्धामध्ये यश मिळायला हवे या जिद्दीने खेळा. उत्कृष्ट सादरीकरणाचा ध्यास घ्या. तणावमुक्त जीवन जगायचे असेल तर क्रीडांगणावर सराव करुन , खेळून घाम गाळावा लागतो असेही त्यांनी यावेळी सांगितले.प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी केले. या स्पर्धामधील विजेते खेळाडू व संघ हे विभागीय क्रीडा स्पर्धासाठी पाठविले जातील. विभागीय क्रीडा स्पर्धा ह्या परभणि येथे दि.३ ते ५ एप्रिल दरम्यान होणार आहेत.

## टी२० वर्ल्ड कप तिकीट काळाबाजारप्रकरणी माजी क्रिकेटपटूसह ६ जणांना अटक

मुंबई–तिकिटांच्या काळाबाजार प्रकरणात मुंबई पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. यावर्षी भारत आणि श्रीलंका येथे टी२० वर्ल्ड कपचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये भारताने विजेतेपद पटकावले. या स्पर्धेतील दुसऱ्या उपांत्य सामन्यात भारत आणि इंग्लंड असा सामना रंगला होता. ५ मार्च रोजी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या सामन्याच्या तिकिटांचा काळाबाजार करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करत पोलिसांनी एका प्रशिक्षकासह एका माजी क्रिकेटपटूला अटक केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी २६ वर्षीय बलवंत सिंह सोधा याला अटक केली .

## मुंबई इंडियन्सच्या कॅप्टनने वानखेडेवर वाटले चक्क १०–१० लाखांचे चेक, पण कारण काय?

मुंबई–आयपीएल २०२६ च्या हंगामासाठी आता फक्त २४ तास बाकी आहेत. पहिला सामना आरसीबी आणि हैदराबाद यांच्यात खेळवला जाईल. तर मुंबई इंडियन्सचा सामना केकेआरसोबत होणार आहे. अशातच आता पहिल्या सामन्याआधी मुंबई इंडियन्सचा कॅप्टन हार्दिक पंड्या याने सर्वांची मने जिंकली आहे. हार्दिकने तब्बल १ कोटी १० लाख रुपयांचं मनमनोकळेपणाने वाटप केलेय. पंड्याने आपले दिलेले वचन पूर्ण केल्याने अनेकांनी त्याचं कौतुक देखील केलेय.

समोर आलेल्या वृत्तानुसार, हार्दिक पंड्या २०२६ च्या टी–२० वर्ल्ड कपच्या तयारीसाठी वानखेडे स्टेडियमवर येत होता. तिथं तो सरावात व्यस्त होता आणि पंड्या तिथंच अनेकदा रात्री उशिरापर्यंत सराव करत असल्याने मैदानातील कर्मचाऱ्यांना जास्त वेळ थांबावे लागत होते. कर्मचाऱ्यांनी घरी न जाता पंड्यासाठी मेहनत घेतली. कर्मचाऱ्यांनी हार्दिकच्या तयारीसाठी कोणतीही कसर सोडली नाही. पंड्याच्या मनाला ही गोष्ट भावली.

सर्व कर्मचाऱ्यांनी मिळून पंड्यासाठी रात्रभर मेहनत घेतली होती. त्यावेळी हार्दिकने त्यांना शब्द दिला होता. जेवढी शक्य होईल, तितकी मदत केली जाईल. मी पुन्हा आपल्यावर तुमच्यासाठी काहीतरी करेल, असं पंड्याने शब्द दिला होता. तो शब्द त्याने खरा करून दाखवला. पंड्याने तब्बल ११ ग्राऊंड स्टाफला प्रत्येकी १० लाख रुपयांचे धनादेश सादर केले आहेत. त्यामुळे हार्दिकचं कौतुक होताना दिसतंय.

मुंबई इंडियन्स सहाव्यांदा ट्रॉफी जिंकणार का?

दरम्यान, यंदा मुंबई इंडियन्स हार्दिक पंड्याच्या नेतृत्वाखाली खेळत आहे. मागील दोन्ही वर्षी मुंबई इंडियन्सला चांगली कामगिरी करता आली नव्हती. त्यामुळे यंदाच्या वर्षी पंड्याच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्स सहाव्यांदा ट्रॉफी जिंकणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागलेय.

## क्रिकेटचा मेगा सीझन! बीसीसीआयकडून भारतीय संघाचे २०२६–२७ चे वेळापत्रक जाहीर

मुंबई–भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने म्हणजेच बीसीसीआय कडून गुरुवारी (२६ मार्च) भारतीय संघाच्या २०२६–२७ च्या देशांतर्गत आंतरराष्ट्रीय हंगामाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. आगामी देशांतर्गत हंगामात रोमांचक आणि थरारक सामने पाहायला मिळणार आहेत. या हंगामात भारतीय संघ एकूण १७ शहरांमध्ये २२ आंतरराष्ट्रीय सामने खेळतील. वेस्ट इंडिजच्या भारत दौऱ्याने हंगामाचा श्रीगणेशा : या हंगामाची सुरुवात वेस्ट इंडिजच्या भारत दौऱ्याने होईल, जो २७ सप्टेंबर २०२६ रोजी सुरू होईल. या दौऱ्यात तीन एकदिवसीय आणि त्यानंतर पाच टी–२० सामन्यांचा समावेश असेल. एकदिवसीय सामने तिरुवनंतपुरम, गुवाहाटी आणि न्यू चंदीगड येथे खेळले जातील, त्यानंतर टी–२० सामने लखनौ, रांची, इंदूर, हैदराबाद आणि बंगळूरु येथे आयोजित केले जातील.

वेस्ट इंडीजचा भारत दौरा : पहिला एकदिवसीय सामना : २७ सप्टेंबर, तिरुवनंतपुरम दुसरा एकदिवसीय सामना : ३० सप्टेंबर, गुवाहाटी तिसरा एकदिवसीय सामना : ३ ऑक्टोबर, न्यू चंदीगड पहिला टी–२० सामना : ६ ऑक्टोबर, लखनऊ दुसरा टी–२० सामना : ९ ऑक्टोबर, रांची तिसरा टी–२० सामना : ११ ऑक्टोबर, इंदूर चौथा टी–२० सामना : १४ ऑक्टोबर, हैदराबाद पाचवा टी–२० सामना : १७ ऑक्टोबर, बंगळूर

त्यानंतर भारत डिसेंबर २०२६ मध्ये श्रीलंकेचे यजमानपद भूषवेल. या मालिकेत तीन एकदिवसीय आणि तीन टी–२० सामने असतील. एकदिवसीय सामने दिल्ली, बंगळूर आणि अहमदाबाद येथे, तर टी–२० सामने राजकोट, कटक आणि पुणे येथे खेळले जातील.

श्रीलंकेचा भारत दौरा : पहिला एकदिवसीय सामना : १३ डिसेंबर, दिल्ली दुसरा एकदिवसीय सामना : १६ डिसेंबर, बंगळूर तिसरा एकदिवसीय सामना : १९ डिसेंबर, अहमदाबाद पहिला टी–२० सामना : २२ डिसेंबर, राजकोट दुसरा टी–२० सामना : २४ डिसेंबर, कटक तिसरा टी–२० सामना : २७ डिसेंबर, पुणे नवीन वर्षाच्या सुरुवातीला, झिम्बाब्वे संघ जानेवारी २०२७ मध्ये तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी भारताचा दौरा करेल. हे सामने कोलकाता, हैदराबाद आणि मुंबई येथे खेळले जातील.




# सिएसके ला मोठा धक्का, महेंद्रसिंह धोनी संघाबाहेर

मुंबई –आयपीएलचा नवीन सीजन आज २८ मार्च पासून सुरु होत आहे. हा आयपीएलचा १९ वा सीजन असणार आहे. ही स्पर्धा सुरु होण्याआधीच अनेक खेळाडू यंदा स्पर्धे बाहेर पडले आहेत. आता आयपीएल आजच्या सिजनच्या पहिल्याच दिवसातच चाहत्यांसाठी मोठा धक्का बसेल अशी माहिती समोर आली आहे. धोनीच्या चाहत्यांसाठी एक वाईट बातमी आहे. महेंद्र सिंह धोनी, जो चेन्नई सुपर किंग्स चा सर्वात अनुभवी आणि लोकप्रिय खेळाडू आहे, दुखापतीमुळे पहिल्या दोन आठवड्यांसाठी मैदानाबाहेर राहणार आहे.

धोनींच्या पिंडरीच्या स्नायूमध्ये ताण आल्यामुळे वैद्यकीय टीमने त्यांना विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे. णएख नेही अधिकृत निवेदनातून ही माहिती दिली असून, मफ्लवकर बरे व्हा, थालाफ्फ असा संदेश सोशल मीडियावर शेअर केला आहे.

### विकेटकीपिंगची जबाबदारी कोणाकडे?

विकेटकीपिंगची जबाबदारी कोणाकडे?

धोनीच्या अनुपस्थितीत णएख मध्ये विकेटकीपिंगची जबाबदारी कोणाकडे जाणार असा प्रश्न सगळ्यांनाच पडला आहे. तर ही महत्त्वाची जबाबदारी संजू सॅमसन याच्याकडे दिली जाऊ शकते. सॅमसनला यंदाच्या हंगामाआधी ट्रेडद्वारे उडघ मध्ये समाविष्ट केले आहे. त्याचा अनुभव संघासाठी महत्वाचा ठरेल. त्याचबरोबर, कर्णधार ऋतुराज गायकवाडला मागील हंगामात झालेल्या दुखापतीनंतर धोनी यांनी संघाचे नेतृत्व यशस्वीपणे सांभाळले होते, त्यामुळे धोनीच्या अनुभवाचा संघाला नेहमीच फायदा होतो.

धोनीचा आयपीएल प्रवास आणि चाहत्यांची प्रतिक्रिया

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून २०२० मध्ये निवृत्ती घेतल्यानंतर धोनी फक्त आयपीएल मध्येच खेळतो. त्यामुळे त्याचे चाहते त्याला बघायला तुफान गर्दी करतात. सर्वांसाठीच ही मोठी पर्वणी आहे. गेल्या सिजनमध्ये त्याने सर्व १४ सामने खेळले आणि संघासाठी महत्त्वाच्या क्षणी धावा केल्या. धोनी पहिल्या दोन आठवड्यांसाठी मैदानाबाहेर असल्यामुळे चाहत्यांमध्ये निराशा आहे, कारण आयपीएल बघताना त्याच्यासारखा खेळाडू नसेल तर उत्साह कमी होतो.तरीही सर्व चाहते एकच प्रार्थना करत आहेत की धोनी लवकर बरे व्हावा आणि पुन्हा मैदानावर आपला जादुई खेळ दाखवावेत. णएख संघालाही या काळात सॅमसन आणि इतर खेळाडूंच्या कामगिरीवर विश्वास ठेवावा लागणार आहे, जेणेकरून संघ सुरुवातीच्या सामन्यांमध्येही प्रतिस्पर्ध्यांवर दबाव ठेवू शकेल.

आजपासून सिजनची सुरुवात, उद्घाटन सामना कोणामध्ये?आज आयपीएल २०२६ चा पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळला जात आहे. या सामन्याबद्दल चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे.

# प्रशासकीय कामात पारदर्शकता, कालमर्यादा आणि विश्वासार्हतेच्या त्रिसूत्रीवर सर्व विभागांनी काम करावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## १५० दिवसांच्या ई– गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विभागांचा गौरव






**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील नागरिकांना सर्व शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ एकाच माध्यमातून मिळण्यासाठी आणि विकसित महाराष्ट्राचे ध्येय साध्य करताना प्रशासकीय कामात पारदर्शकता, कालमर्यादा आणि विश्वासार्हता या त्रिसुत्रीच्या आधारावर सर्व विभागांनी काम करावे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथिगृह येथे १५० दिवसांच्या ई–गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत निवडलेली उत्कृष्ट कार्यालये व सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत निवडलेल्या उत्कृष्ट कार्यालय प्रमुखांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी माहिती तंत्रज्ञान तथा संस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्यासह सर्व मंत्रालय विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव सचिव यांच्यासह १५० दिवसांच्या ई– गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य करणारे प्रमुख अधिकारी प्रत्यक्ष व दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

**माहिती व तंत्रज्ञान विभागाने एक राज्य, एक पोर्टल संकल्पना राबवावी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सांगितले की, माहिती तंत्रज्ञान विभागाने एक राज्य, एक पोर्टल ही संकल्पना राबवावी. शासनाच्या अनेक वेगवेगळ्या संकेतस्थळांमुळे नागरिकांचा होणारा संभ्रम टाळण्यासाठी सर्व सेवांचे एकत्रीकरण असलेले एकच पोर्टल माहिती व तंत्रज्ञान विभ्‌ागाने तयार करावे. सर्व शासकीय सुविधा नागरिकांना सहजरित्या उपलब्ध होण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने प्राधान्याने काम करावे.

महाआयडी प्रणालीच्या माध्यमातून नागरिकांसाठी एक विशिष्ट महाआयडी तयार करण्यात येईल. आणि केवळ एका आयडीच्या आधारावर सर्व शासकीय योजनांचा लाभ घेता येईल. ज्यामुळे डेटा फिल्टर होऊन सेवांचा दुरुपयोग थांबण्यास मदत होईल. यासोबतच अनेक विभागांचे कामकाज हे बहुतेक प्रमाणात ई– ऑफीस झाले असून ते लो पेपर वरून नो पेपरवर नेण्यासाठी मुख्य सचिवांनी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करावा, अशा सूचनाही यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

**महासारथी' मुळे सर्व शासकीय डेटा एकत्रित होण्यास मदत**

या कार्यक्रमा दरम्यान माहिती तंत्रज्ञान विभागाने तयार केलेल्या महासारथी या संकेतस्थळाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. महासारथी संकेतस्थळाचे लोकार्पण केल्यानंतर मुख्यमंत्री म्हणाले की, हे संकेतस्थळ म्हणजे आपली डेटा बँक आहे. या संकेतस्थळाच्या माध्यमातून सर्व शासकीय डेटा एकत्रित करण्यात आला असून त्याद्वारे एकमेकांशी संवाद साधता येईल. तसेच नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेखीसाठी महाराष्ट्र इंटिग्रेटेड डेटा एक्सचेंज तयार करत असून ज्यामुळे डाटा ड्रिव्हन निर्णय प्रक्रिया राबविता येणे शक्य होणार आहे.

**महा–विस्तार हे एआय ॲप्लिकेशन देशात पथदर्शक**

एआय आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या आधारे अहोरात्र अविरत सेवा देण्यासाठी जनरेटिव्ह एआय आणि चॅटबॉट्स, ब्लॉकचेन यांचा वापर वाढवण्यावर अधिक भर दिला जाणार आहे. या अंतर्गत कृषी विभागाने तयार केलेले महा–विस्तार हे एआय ॲप्लिकेशन देशात पथदर्शक ठरले असून, त्यात आदिवासी भाषांचाही समावेश करण्यात आला आहे. यामध्ये शेतीशी संबंधित सर्व माहिती, हवामान अंदाज याबाबत देखील माहिती उपलब्ध आहे. इतरही विभागांनी कृषी विभागाने तयार केलेल्या या महा–विस्तार एआय प्रणाली सारखे एआयचा उपयोग करून काही वेगळे करण्यायसाठी प्रयत्न करावेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी यावेळी सांगितले.

प्रशासकीय कामगिरीत गेल्या १५०–२०० दिवसांत ४२ विभागांचा आढावा घेऊन या काळात साधारण ४०,००० पदांवर अधिकारी – कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे, ज्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कामात गतिमानता आली आहे. तसेच प्लॅटफॉर्मवर महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर आहे. १५० दिवसांचा ई–गव्हर्नन्सच्या कालावधीतील पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला असल्याने सर्व शासकीय विभागाचे आणि सहभागी कर्मचाऱ्यांचे आणि सेवाकर्मींचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी अभिनंदन केले.

**१५० दिवसांचा ई–गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेले शासकीय कार्यालय:**

**सर्वोत्तम मंत्रालयीन विभाग :** सार्वजनिक बांधकाम विभाग, वन विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, परिवहन आणि बंदरे विभाग, पर्यावरण आणि वातावरण बदल विभाग, शालेय शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग

**सर्वोत्तम विभागीय आयुक्त:** नागपूर, छत्रपती संभाजीनगर

**सर्वोत्तम जिल्हाधिकारी:**

जळगाव, ठाणे, धाराशिव, लातूर, कोल्हापूर

**सर्वोत्तम जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी :**

पुणे, सांगली, ठाणे, नागपूर, नाशिक

सर्वोत्तम पोलीस अधीक्षक: ठाणे (ग्रामीण), नागपूर (ग्रामीण), अकोला, पुणे (ग्रामीण), रत्नागिरी

**सर्वोत्तम महानगरपालिका आयुक्त :**

पनवेल, पुणे, उल्हासनगर, नवी मुंबई, अमरावती

**सर्वोत्तम पोलीस परिक्षेत्र महानिरीक्षक/ उपमहानिरीक्षक :**

नांदेड, नागपूर

**सर्वोत्तम पोलीस आयुक्त:** नाशिक, ठाणे, नागपूर

याशिवाय या कार्यक्रमात सर्वोत्तम आयुक्त/संचालक, सर्वोत्तम शासकीय संस्था/मंडळे आणि कंपन्या यांच्यासह सेवाकर्मी कार्यक्रमाअंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणारे सचिव, शासकीय कार्यालये/ आस्थापना यांना सुध्दा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# शतायुषी माऊलींचा निरोप –स्वातंत्र्य सैनिक पत्नी श्रीमती चंद्रकला काकी कारीकर यांचे निधन

**सोलापूर/प्रतिनिधी :** मूळचे बीड जिल्ह्यातील धारूर येथील आणि व्यवसायानिमित्त कोल्हापूर सोलापूर येथे स्थायिक झालेले प्रसिद्ध सराफ उद्योजक आणि पंढरपूर येथील संत नरहरी महाराज समाधी मंदिर समितीचे माजी अध्यक्ष श्री. भारतराव कारीकर यांच्या मातोश्री श्रीमती चंद्रकला



काकी प्रल्हादराव कारीकर यांचे दि. २८ मार्च रोजी सकाळी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांनी वयाची शंभरी ( १०० वर्षे ) पूर्ण केली होती. खऱ्या अर्थाने त्यांनी एक यशस्वी कृतार्थ शतायुषी जीवन जगून या जगाचा निरोप घेतला. श्रीमती चंद्रकला काकी या अत्यंत धार्मिक, सात्विक आणि संयमी वृत्तीच्या होत्या. त्यांचे पती स्व. प्रल्हादराव कारीकर हे ख्यातनाम स्वातंत्र्य सैनिक होते.

विशेष आणि भावुक योगायोग म्हणजे येत्या दोन दिवसातच स्व. प्रल्हादराव कारीकर यांचा स्मृतिदिन ( पुण्यस्मरण )असून त्यापूर्वीच काकीनी आपले जीवनकार्य पूर्ण केले. आपल्या संपूर्ण आयुष्यात त्यांनी कुटुंबातील पाचवी पिढी आपल्या डोळ्यांनी पाहिली असे महान भाग्य त्यांना लाभले होते. त्यांच्या पश्चात मुलगा श्री. भारतराव कारीकर, तीन नातू, पणतू, परतवंडे आणि पणती असा मोठा परिवार असून, कारीकर कुटुंबाचा हा आधारवड हरपल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे . कोल्हापूर, सोलापूर, पंढरपूर कराड मधील सराफ व्यावसायिक, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी या शतायुषी माऊलीला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# दयानंद कला महाविद्यालयात 'प्रकल्प, क्षेत्रीय संकलन व शिक्षणांतर्गत सेवा' विषयावर कार्यशाळा संपन्न !

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद कला महाविद्यालयातील मराठी विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रकल्प, क्षेत्रीय संकलन व शिक्षणांतर्गत सेवा' या विषयावर विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत प्रमुख साधन व्यक्ती म्हणून डॉ. ब्रिजमोहन दायमा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता व्यावहारिक अनुभवातून शिकावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'प्रकल्प, क्षेत्रीय संकलन व शिक्षणांतर्गत सेवा' या विषयावरील विशेष व्याख्यान आणि कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या प्रसंगी प्रमुख साधन व्यक्ती म्हणून डॉ. ब्रिजमोहन दायमा यांनी व्यवहारातील विविध उदाहरणे देत विद्यार्थ्यांना या विषयाचे महत्त्व पटवून दिले.क्षेत्रीय प्रकल्प करताना पुस्तकांतील ज्ञानाला

व्यावहारिक ज्ञानाची जोड आवश्यक असते असे मत प्रतिपादन केले.

आपल्या मार्गदर्शनात डॉ. दायमा म्हणाले की, कोणत्याही प्रकल्पाचे यश हे त्याच्या सूक्ष्म नियोजनावर आणि क्षेत्रीय संकलनावर (ऋळशश्रव उेश्रश्रशलींळेप) अवलंबून असते. केवळ माहिती गोळा करणे म्हणजे संकलन नव्हे, तर त्या माहितीचे विश्र्लेषण करून त्यातून निष्कर्ष काढणे महत्त्वाचे आहे. दैनंदिन व्यवहारातील सोपी उदाहरणे देत त्यांनी प्रकल्पाची मांडणी कशी करावी, यावर सविस्तर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. सुनीता सांगोले यांनी केले. त्यांनी क्षेत्रीय संकलन म्हणजे काय? त्याचे नियोजन कसे करावे आणि यासाठी निवडावयाचे विविध विषय यावर सविस्तर मांडणी केली. ही कार्यशाळा आयोजित करण्यामागची भूमिका स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, संशोधक अभ्यासक आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा, हा यामागचा मुख्य हेतू आहे.

अंतर्गत गुणवत्ता हमी विभागाचे समन्वयक डॉ. संतोष पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ही कार्यशाळा पार पडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अंकुशकुमार चव्हाण यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डॉ. सुभाष कदम यांनी मानले.

या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक राजू मोरे, अंगद भुरे, सुलक्षणा सोनवणे यांच्यासह पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी आणि संशोधक अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक आणि संशोधन प्रकल्पांसाठी मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

# वसईच्या भोंदूबाबाला पुण्यात येताच मिळाले कर्माचे फळ; हडपसरच्या लॉजमधले महिलेसोबतचे ते कांड भोवले

पुणे : स्वत: महादेवाचा अवतार असल्याचे सांगत एका ३५ वर्षीय महिलेवर अत्याचार करणाऱ्या स्वयंघोषित धर्मगुरू ऋषिकेश वैद्य याला पुणे पोलिसांनी अटक केली आहे. पुण्यातील हडपसर (मांजरी) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर हा भोंदू बाबा फरार झाला होता. मात्र पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे त्याला पिंपरी परिसरातून ताब्यात घेतले.नाशिकच्या खरात प्रकरणानंतर या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. गुन्हा दाखल होताच पुणे पोलिसांची विविध पथके ऋषिकेश वैद्यचा माग काढत होती. अखेर शुक्रवारी संध्याकाळच्या सुमारास तो पिंपरी परिसरात असल्याची पक्की माहिती मिळाली आणि पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या.

# स्था.स्व.सं. मध्ये निवडून आलेल्या धनगर समाजातील लोकप्रतिनिधींचा मंगळवारी भव्य सत्कार सोहळा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत निवडून आलेल्या धनगर समाजातील नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा भव्य सत्कार सोहळा मंगळवार , दि. ३१ मार्च २०२६ रोजी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम मंगळवारी सकाळी ११ वाजता अंबेजोगाई रोडवरील विष्णुदास मंगल कार्यालयात होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ऑल इंडिया धनगर महासंघाचे राष्ट्रीय सचिव डॉ. पंकज भिवटे, भाजप ओबीसी महिला मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा डॉ. सौ. उज्वलाताई हाके, डॉ. सचिन शेंडगे यांची उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्यात विशेष सत्कारमूर्ती म्हणून राज्यसभेचे नवनियुक्त खासदार रामराव वडकुते, आयपीएस अधिकारी अविनाश बारगळ, सर्वोच्च न्यायालयाचे विधिज्ञ विठ्ठल आदित्य यांचा सन्मान करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत निवडून आलेले लातूर मनपाचे विरोधी पक्षनेते देविदास काळे, मनपा सदस्य दीपक सूळ, सौ. सपनाताई किसवे , पवन सोलंकर, सौ. छाया बंडगर, श्रीमती चंद्रकला मदने, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, जि .प. उपगटनेते महादेव साळुंके, जि प सदस्य बाळू माने, जि . प. सदस्या सौ. शीतल खोमणे, सौ. जयश्री तवले, अहमदपूरच्या नगरसेविका सौ. उषा देवकते , सौ. भाग्यश्री बारमाळे , रेणापूरचे नगरसेवक दत्ता सरवदे, शिरूर अनंतपाळचे उपनगराध्यक्ष अनंत काळे, निलंगाचे नगरसेवक सौ. संगीत पेठकर, स्वीकृत सदस्य गजेंद्र तरंगे, लातूर पंचायत समितीचे सभापती श्रीकांत बैले, निलंगा पं .स. ,विवेक कोकणे, पं . स. सदस्या सौ. जयश्री घोडके, सौ. सिंधू हजारे, पं . स. सदस्य औसा परमेश्वर लांडगे , पं . स. सदस्य जळकोट राहुल झोले,पं . स. सदस्य रेणापूर बालाजी गोटके , सदस्या सौ. अंजली काळे, पं . स. सदस्य चाकूर सौ. सुप्रिया हाके या लोकप्रतिनिधींचाही जाहीर सत्कार करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे आयोजक लोकमाता अहिल्या प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष अनिल गोयकर हे आहेत. तर संयोजक अनिल पुजारी, डॉ. प्रशांत काळे, चंद्रकांत हजारे, चंद्रकांत खटके, सौ. हेमा येळे , सौ. सुमित्रा चिगुरे, संदेश गडदे,शिवशांत हरिभाऊ काळे हे आहेत.

# माईर एमआयटी लातूर येथे 'विश्वमैदान २०२६' आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचा सोमवारी भव्य शुभारंभ

## पाच दिवसीय क्रीडा महोत्सवात अंतिम सामने रंगणार; प्रा. तेजस कराड यांची माहिती

**लातूर/प्रतिनिधी :** माईर एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूर यांच्या वतीने 'विश्वमैदान २०२६' या आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे भव्य आयोजन करण्यात आले असून, हा पाच दिवसीय क्रीडा महोत्सव ३० मार्च ते ३ एप्रिल २०२६ या कालावधीत रंगणार आहे.

या स्पर्धेचा उदघाटन समारंभ सोमवार, दि. ३० मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता माईर एमआयटी शिक्षण संकुलातील विश्वधर्मी विश्व मैदान क्रीडांगणावर पार पडणार आहे. उद्घाटनासाठी महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार विक्रम काळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी सन्माननीय पाहुण्या म्हणून लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच क्रीडा व युवक सेवा विभागाचे उप संचालक महादेव कसगावडे, माजी रणजी क्रिकेटपटू विशाल गिते, आंतर राष्ट्रीय नेमबाज जागृती चंदनकेरे–बोपचंडे, आंतर राष्ट्रीय बेसबॉल खेळाडू ज्योती पवार यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.






प्रा. तेजस कराड

समारोप सोहळा शुक्रवार, दि. ३ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता होणार असून, लातूर लोकसभेचे खासदार डॉ. शिवाजी काळगे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी लातूर भाजपचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील मुरूमकर, लातूर मनपा नगरसेविका प्रेरणा होनराव आणि मनपा उपायुक्त वसुधा फड उपस्थित राहणार आहेत. तसेच कर्करोग तज्ञ डॉ. ब्रिजमोहन झंवर व भूलतज्ञ डॉ. आरती झंवर सहभागी खेळाडूंना मार्गदर्शन करणार आहेत.

या क्रीडा महोत्सवा मागे माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे संस्थापक डॉ. विश्वनाथ दा. कराड यांची प्रेरणादायी संकल्पना असून, कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे.

''एकच आव्हान, जिंकूया मैदान!'' या घोषवाक्याखाली होत असलेल्या या स्पर्धांचा उद्देश युवकांमध्ये क्रीडावृत्ती, नेतृत्वगुण, शिस्त आणि संघभावना विकसित करणे हा आहे. ''वसुधैव कुटुंबकम्'' या तत्त्वावर आधारित हा महोत्सव बंधुभाव, एकात्मता आणि जागतिक शांततेचा संदेश देणार आहे.

या स्पर्धेअंतर्गत २२ ते २९ मार्च दरम्यान इनडोअर व आउटडोअर प्रकारातील लीग व नॉकआउट सामने पार पडले असून, विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील ७५३ खेळाडूंनी सहभाग घेतला. उपांत्य फेरीतील विजेत्यांनी अंतिम फेरीत प्रवेश मिळवला असून, ३० मार्च ते ३ एप्रिल दरम्यान विविध क्रीडा प्रकारांचे अंतिम सामने रंगणार आहेत, अशी माहिती संचालक प्रा. तेजस हनुमंत कराड यांनी दिली.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८, २४५४०९



# तुळजापूरात विद्यार्थिनीचा मानाचा गौरव : जव्हेरिया जुबेर शेखला गणित ऑलिम्पियाडमध्ये गोल्ड मेडल

तुळजापूर (प्रतिनिधी)- शहरातील तुळजामाता इंग्लिश मीडियम स्कूल मधील इयत्ता पहिलीतील विद्यार्थिनी जव्हेरिया जुबेर शेख हिने लहान वयातच उल्लेखनीय यश संपादन करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. ऑलिम्पियाड परीक्षेतील गणित विषयात तिने तब्बल ९७.९८% गुण मिळवत गोल्ड मेडल पटकावले आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेच्या वतीने जव्हेरियाचा विशेष सत्कार करण्यात आला.शाळेचे प्राचार्य लोद मॅडम व राजेश जगताप सर यांच्या हस्ते तिला गोल्ड मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.यावेळी शाळेतील शिक्षकवर्ग,विद्यार्थी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

जव्हेरिया ही वीर महाराष्ट्र न्यूज व सा.नेक्स्ट फ्रेमचे संपादक यांची मोठी मुलगी असून तिच्या यशामुळे शाळेसह तुळजापूर शहराचा अभिमान वाढला आहे. लहान वयातच गणित विषयात दाखवलेली तिची प्रावीण्य आणि मेहनत कौतुकास्पद असल्याचे शिक्षकांनी सांगितले.

यावेळी उपस्थितांनी तसेच शेख परिवाराच्या वतिने जव्हेरियाचे अभिनंदन करत तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.तिच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# के. टी. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात एकदिवसीय राष्ट्रीय सेमिनार संपन्न




धाराशिव (प्रतिनिधी)- दिनांक २८ मार्च २०२६ रोजी के. टी. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात फार्मास्युटिकल शिक्षण व संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI ) प्रभावी वापर या विषयावर एकदिवसीय सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. सेमिनारचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अमोल जोशी व प्रमुख वक्ते डॉक्टर अन्वर शेख (प्राध्यापक व विभाग प्रमुख आलाना कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे ) व मान्यवरांच्या उपस्थितीत ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. सदर सेमिनारचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या सेमिनारची प्रस्तावना प्रा. रागिणी राजमाने यांनी केली. या सेमिनारचा उद्देश विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे व औषधनिर्माण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग समजावून सांगणे हा होता. यावेळी तज्ज्ञ वक्त्यांनी AI चा उपयोग औषध संशोधन, डेटा विश्लेषण, औषध डिझाईन आणि रुग्णसेवा सुधारण्यासाठी कसा करता येतो याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. संशोधनामध्ये AI मुळे औषध शोध प्रक्रिया अधिक जलद, अचूक आणि खर्चिकदृष्ट्या परिणामकारक होत असल्याचे त्यांनी नमूद केले. सत्राच्या शेवटी प्रश्नउत्तराचे सत्र आयोजित करण्यात आले आणि या सत्रानंतर कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. सदर सेमिनार मध्ये बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सेमिनारसाठी मुख्य समानव्यक म्हणून एम फार्म विभाग प्रमुख डॉ.आमेर काझी यांनी काम पहिले. तसेच सदर सेमिनार यशस्वी करण्यासाठी प्रा.शरद माळी, प्रा.नदीम खान, प्रा. इम्रान मोमीन, प्रा. स्वाती लोंढे, प्रा. रागिणी राजमाने, प्रा. स्वाती भोसले यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कळंब येथून मोटारसायकलची चोरी

कळंब(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी दिनेश राजाभाउ कोलांगडे, वय २८ वर्षे, रा. पुनर्वसन सावरगाव कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांची अंदाजे २७,००० किंमतीची मोटरसायकल ही दि.२३.०३.२०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक कळंब येथील भडगे मेडीकल समोर कळंब येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.


**परिशिष्ट-३**

**महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, धाराशिव यांचे कार्यालय**

**पत्ता:- नविन सिंचन भवन, तुळजापूर बायपास रोड, धाराशिव- ४१३५०१**

ई-मेल:- eemechdobd@gmail.com दुरध्वनी क्र.: (०२४७२) २५१८५३

## ई-निविदा सुचना क्र. १९ सन २०२५-२०२६

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, धाराशिव जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे खाली नमूद केलेल्या कामाचा पुर्वानुभव असलेल्या सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामासाठी ब-१ नमुन्यात (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. शासन जलसंपदा विभाग निर्णय क्र. संकीर्ण/१११७/प्र.क्र. १०४/१७/यांत्रिकी, दि. १४/०३/२०१८ अन्वये निविदा सादर करणारे कंत्राटदार जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, धाराशिव यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| | |
|---|---|
| कामाचे नाव:- | निम्न तेरणा प्रकल्प, माकणी येथील वक्रद्वारे १२ X ८ मी. १४ नग,थोपद्वारे १२ X १ मी. १८ नग वक्रद्वारे उच्चालक ४२ में टन क्षमता,गोलिएथ क्रेन १६ मे. टन दुरुस्ती व अनुषंगीक कामे. |
| जिल्हा:- | धाराशिव |
| निविदेची अंदाजित किंमत रुपये :- | रू.२,५०,०२,९४८/- (अक्षरी-दोन कोटी पन्नास लक्ष दोन हजार नऊशे अठ्ठेचाळीस मात्र.) |
| ऑनलाईन कोऱ्या निविदा संच विक्री कालावधी :- | दिनांक :- ३०/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. पासुन दिनांक :- ०६/०४/२०२६ रोजी सायंकाळी १८.०० वा. पर्यंत |
| ऑनलाईन भरलेल्या निविदा सादर करणेचा कालावधी :- | दिनांक:- ३०/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. पासुन दिनांक :- ०६/०४/२०२६ रोजी सायंकाळी १८.०० वा. पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडणेचा कालावधी:- | दिनांक:- ०९/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. (शक्य झाल्यास) |

**खालील ठिकाणों निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१) संकेतस्थळ :- www.wrd.maharashtra.gov.in व http://mahatenders.gov.in
२) सदर निविदेसुचनेमध्ये / निविदेमध्ये काही बदल होत असल्यास असे बदल फक्त या कार्यालयाचे सूचनाफलकावर आणि वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील (वृत्तपत्रात प्रसिध्द केले जाणार नाही.)
३) सदर निविदेमधील अटी व शर्तीची पुर्तता निविदाकारांकडुन न झाल्यास सदरील निविदा सूचना मागणीसाठी उपरोक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील (वृत्तपत्रात प्रसिध्द केले जाणार नाही.)
४) निविदा उघडण्याची तारीख व वेळेनुसार कंत्राटदाराने किंवा त्याच्या अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित रहावे अन्यथा निविदा उघडल्यास कोणतोहों तक्रार स्वीकारली जाणार नाही.
५) ई-निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकारांकडून निविदा छापील प्रतीच्या (हार्ड कॉपी) स्वरुपात स्विकारली जाणार नाही.
६) निविदाकारासमवेत निविदा पूर्व बैठक (Pre-Bid Conferesnce) लागू नाही.
७) निविदाकारांनी कागदपत्रे अपलोड/सादर करताना निविदा प्रत स्कॅन करुन इतर कागदपत्रामध्ये अपलोड करु नये.
८) कार्यारंभ आदेश दिल्यानंतर निविदाकारा मार्फत सादर होणाऱ्या देयकासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे खोटी आढळल्यास त्यासाठीही संबंधीत निविदाकार भारतीय दंड संहिता व माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० मधील कलमाप्रमाणे कारवाईस पात्र राहतील. अशा निविदेतील कामे प्रारंभिक स्तरावर असल्यास निविदा रद्द केली जाईल व निविदाकारास काळया यादीत टाकणेत येईल.

**जा.क्र. यांविधा/निविदा/ ५९० /सन २०२६**
**कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, धाराशिव यांचे कार्यालय,**
**दि.:- १८-०३-२०२६**

**स्वाक्षरीत/-**
**(यु. ई. पेरमपल्ली)**
**कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग, धाराशिव**


# नळदुर्गच्या भुईकोट किल्ल्यासाठी सव्वा सात कोटी संवर्धन कामांना मंजुरी

## ऐतिहासिक किल्ल्याचे रुप पालटणार - आ. राणाजगजितसिंह पाटील



**धाराशिव (रामेश्वर डोंगरे)-** राज्यातील सर्वात मोठा भुईकोट किल्ला अशी ख्याती असलेल्या आणि मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या नळदुर्ग किल्ल्याच्या जतन आणि संवर्धनासाठी राज्य शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'नळदुर्ग किल्ला संवर्धन आणि स्थळ व्यवस्थापन आराखडा' या आराखड्यानंतर्गत पहिल्या टप्प्यातील कामांसाठी तब्बल ७ कोटी १८ लाख ९१ हजार ७९१ रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे. कामाची निविदा प्रक्रियाही नुकतीच सुरू झाली आहे. त्यामुळे धाराशिव जिल्ह्याच्या पर्यटन व्यवसायाचा मानबिंदू असलेल्या ऐतिहासिक नळदुर्ग किल्ल्याचे रुप आता पालटणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे. शासनाच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालयामार्फत हे काम पूर्ण केले जाणार आहे. या प्रकल्पामुळे दुर्लक्षित राहिलेल्या नळदुर्ग किल्ल्याला पुन्हा एकदा गतवैभव लाभणार आहे. नळदुर्ग किल्ल्याच्या या पहिल्या टप्प्यातील कामात अनेक महत्वाच्या बाबींचा समावेश करण्यात आला आहे. यात प्रामुख्याने तटबंदीचे संवर्धन हाती घेण्यात येणार आहे. किल्ल्याची ऐतिहासिक तटबंदी अनेक ठिकाणी कमकुवत झाली आहे, त्याचे शास्त्रोक्त पद्धतीने संवर्धन केले जाणार आहे. किल्ल्यातील झुडपे आणि राडारोडाही हटविण्यात येणार आहे. किल्ल्याच्या परिसरात आणि तटबंदीवर वाढलेली अनावश्यक झुडपे तसेच साचलेला राडारोडा पूर्णपणे साफ करण्यावर विशेष लक्ष देण्यात येणार आहे. देशभरातून तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी येणारे लाखो भाविक आवर्जून या भुईकोट किल्ल्याला भेट देतात. आंध्रप्रदेश आणि कर्नाटक राज्यातून शिर्डीला दर्शनासाठी जाणारे भाविक आणि पर्यटकही अलीकडच्या काळात मोठ्या संख्येने किल्ला पाहण्यासाठी येत आहेत. पर्यटकांच्या सोयीसाठी आणि किल्ल्याचे सौंदर्य वाढवण्यासाठी स्थळ व्यवस्थापन आराखड्याची अंमलबजावणी पहिल्या टप्प्यात हाती घेण्यात आली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

**पर्यटन व्यवसायाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न**

कामाचा दर्जा राखण्यासाठी पुरातत्व विभागाच्या नियमांनुसार आणि तज्ज्ञ वास्तुविशारदांच्या मार्गदर्शनाखाली हे काम पूर्ण करण्याचे कंत्राटदाराला बंधनकारक असणार आहे. त्यामुळे पुढील दीड वर्षाच्या आत पर्यटकांना नळदर्ग किल्ल्याचे पालटलेले रूप पाहायला मिळणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.या संवर्धन प्रकल्पामुळे नळदुर्ग किल्ला पर्यटनाच्या नकाशावर अधिक ठळकपणे येईल आणि स्थानिक पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे. पर्यटन व्यवसायाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीसाठी आपण सुरू केलेल्या प्रयत्नांना या कामामुळे आणखी दिलासा मिळणार असल्याचा दावाही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केला आहे.

# कळंब तालुक्याचा 'पॉवर गेम' बदलला! महिला व बालकल्याण सभापतीपदी पूजा शिंदे; शिवसेनेचा दमदार झेंडा उंचावला!



**कळंब/धाराशिव (रामेश्वर डोंगरे )** जिल्हा परिषदेत मोठा राजकीय 'धडाका' करत महिला व बालकल्याण सभापतीपदी सौ. पूजा तुषार शिंदे यांची निवड झाल्यानंतर संपूर्ण कळंब तालुका आणि शिवसेना परिवारात उत्साहाचा स्फोट झाला आहे. या निवडीमुळे जिल्हा परिषदेत कळंब तालुक्याचा दबदबा प्रस्थापित झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

शिवसेना परिवाराच्या वतीने सौ. पूजा शिंदे यांचा पुष्पगुच्छ देऊन भव्य सत्कार करण्यात आला. ही निवड म्हणजे केवळ पद नाही, तर कळंबच्या जनतेचा सन्मान आहे, अशी प्रतिक्रिया शिवसैनिकांकडून व्यक्त करण्यात आली.

या निवडीमागे महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व, तसेच पालकमंत्री प्रताप सरनाईक, माजी खासदार रवींद्र गायकवाड, संपर्कप्रमुख राजन साळवी आणि आमदार ज्ञानराज चौगुले यांचा निर्णायक पाठिंबा असल्याचे बोलले जात आहे. कळंब तालुक्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांनी या सर्व नेत्यांचे विशेष आभार मानत सशक्त नेतृत्वाला न्याय मिळाला अशी भावना व्यक्त केली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी पूजा शिंदे यांचे जोरदार अभिनंदन करत, महिला व बालकल्याण क्षेत्रात त्या धडाकेबाज कामगिरी करून दाखवतील, असा ठाम विश्वास व्यक्त केला.

**कोण होते उपस्थित?**

शिवसेना जिल्हाप्रमुख अजित पिंगळे, जि.प. सदस्य अनंत लंगडे, पंचायत समिती सभापती राजश्री वरपे, उपजिल्हाप्रमुख अनंत वाघमारे, तालुकाप्रमुख लक्ष्मीकांत हुलजुते, तुषार शिंदे, नारायण टेकाळे यांच्यासह शेकडो शिवसैनिकांनी कार्यक्रमाला हजेरी लावली.

पूजा शिंदे यांच्या निवडीमुळे आगामी स्थानिक राजकारणात शिवसेनेचा प्रभाव अधिक वाढणार, अशी स्पष्ट चिन्हे दिसत आहेत. कळंब तालुक्याला मिळालेले हे पॉवर सेंटर पुढील निवडणुकांमध्ये गेमचेंजर ठरू शकतो

# शिवरायांचा पुतळा हटवण्याचा निर्णय; गावकऱ्यांचे रस्त्यावर ठिय्या आंदोलन

शिराढोण (प्रतिनिधी)- कळंब तालुक्यातील शिराढोण येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या उभारणीमुळे तणाव निर्माण झाला होता. मात्र, पोलीसांनी योग्य पद्धतीने परिस्थिती हाताळून चर्चेनंतर मार्ग काढला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा मुख्य चौकात बसवण्याचा निर्णय झाला असून त्यानंतर तणाव शांत झाला आहे.

कळंब तालुक्यातील शिराढोण येथे पहाटे सुमारे पाच वाजता छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला होता. सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास सहायक पोलीस निरीक्षक धरणीधर कोळेकर यांनी संबंधित ठिकाणाहून पुतळा हटवण्याची कारवाई केली. पुतळा ट्रॅक्टरमध्ये इतर ठिकाणी नेताना रस्त्यावरील विद्युत पोल आणि तारांमुळे अडथळा निर्माण झाला. त्यानंतर ग्रामस्थांनी पुतळा इतरत्र नेण्याचा विरोध करत रस्त्यावर ठिय्या आंदोलन केले, यात महिलांची संख्या लक्षणीय होती. दरम्यान, पुतळ्याची पुन्हा त्याच ठिकाणी स्थापना करण्याच्या मागणीसाठी गावातील युवक ओंकार टेळे सकाळी ७ वाजता यांनी विद्युत खांबावर चढून सुमारे सात तास आंदोलन केले.

त्यांच्या हातात सहा फूट लांबीचे कापड होते. बाळराजे आवारे पाटील यांच्याशी चर्चा झाल्यानंतर संबंधित युवक सात तासानंतर खाली उतरला. तर सुरज माळी या युवकाने अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र वेळीच पोलीसांनी हस्तक्षेप केल्यामुळे अनुचित प्रकार टळला आहे.


**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649